**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८**

**मा.महापालिका सभा**

**कार्यपत्रिका क्रमांक - ३८.**

**सभावृत्तांत**

दिनांक - २०.१२.२०१४ वेळ - दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे डिसेंबर २०१४ ची मासिक मा.महापालिका सभा शनिवार दि.२०.१२.२०१४ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब - महापौर
२. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
३. मा.भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस.के. बापू
४. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ
५. मा.भालेकर अरुणा दिलीप
६. मा.सौ.स्वाती प्रमोद साने
७. मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)
८. मा.थोरात वनिता एकनाथ
९. मा.सायकर अजय शंकरराव
१०. मा.जाधव साधना रामदास
११. मा.जाधव राहुल गुलाब
१२. मा.आल्हाट मंदा उत्तम
१३. मा.आल्हाट धनंजय मुरलीधर
१४. मा.काळजे नितीन प्रताप
१५. मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर
१६. मा.बाबर शारदा प्रकाश
१७. मा.बहिरवाडे नारायण सदाशिव
१८. मा.सौ.मंगलाताई अशोक कदम
१९. मा.उल्हास शेट्टी
२०. मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर
२१. मा.पवार संगीता शाम

२२. मा.उबाळे सुलभा रामभाऊ

२३. मा.तानाजी विठ्ठल खाडे

२४. मा.बो-हाडे शुभांगी संजय

२५. मा.भारती फरांदे

२६. मा.आर.एस.कुमार

२७. मा.जावेद रमजान शेख

२८. मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर

२९. मा.पांढरकर निलेश शंकरराव

३०. मा.नेटके सुमन राजेंद्र

३१. मा.तरस बाळासाहेब जयवंत

३२. मा.भोंडवे संगिता राजेंद्र

३३. मा.मोरेश्वर महादू भोंडवे

३४. मा.सूर्यवंशी आशा ज्ञानेश्वर

३५. मा.लोंढे गणेश नारायण

३६. मा.शमीम पठाण (पठाणबाई)

३७. मा.†›.संदीप गुलाब चिंचवडे

३८. मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

३९. मा.अपर्णा निलेश डोके

४०. मा.अनंत सुभाष को-हाळे

४१. मा.जयश्री वसंत गावडे

४२. मा.प्रसाद शेट्टी

४३. मा.अविनाश (दादा) टेकावडे

४४. मा.काळभोर वैशाली जालिंदर

४५. मा.सौ.साळुंके सविता सुरेश

४६. मा.शेख अस्लम शैकत

४७. मा.सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन

४८. मा.मासुळकर समीर मोरेश्वर

४९. मा.वाबळे संजय मल्हारराव

५०. मा.मडिगेरी वर्षा विलास

५१. मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडुरंग

५२. मा.सुपे आशा रविंद्र

५३. मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके

५४. मा.मोहिनीताई विलास लांडे

५५. मा.अजित दामोदर गव्हाणे

५६. मा.गोफणे अनुराधा देविदास

५७. मा.गव्हाणे सुरेखा शंकर

५८. मा.श्रध्दा बाजीराव लांडे

५९. मा.†›.नितीन ज्ञानेश्वर लांडगे

६०. मा.लोंढे शुभांगी संतोष

६१. मा.विश्वनाथ विठोबा लांडे

६२. मा.ननवरे जितेंद्र बाबा

६३. मा.सावळे सिमा रविंद्र

६४. मा.सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ

६५. मा.भोसले राहूल हनुमंतराव

६६. मा.पालांडे सुजाता सुनिल

६७. मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद

६८. मा.कदम सदगुरु महादेव

६९. मा.गिता सुशील मंचरकर

७०. मा.कैलास महादेव कदम

७१. मा.छाया जगन्नाथ साबळे

७२. मा.पहलानी गुरुबक्ष किशनदास

७३. मा.आसवाणी सविता धनराज

७४. मा.वाघेरे सुनिता राजेश

७५. मा.आसवानी हिरानंद उर्फ डब्बू किमतराम

७६. मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

७७. मा.ताम्हणकर प्रमोद रघुनाथ

७८. मा.काळे विमल रमेश

७९. मा.पाडाळे निता विलास

८०. मा.विनोद जयवंत नढे

८१. मा.तापकीर अनिता मच्छिंद्र

८२. मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे

८३. मा.विमलताई सुरेश जगताप

८४. मा.अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा पवार

८५. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

८६. मा.आप्पा उर्फ श्रीरंग चंदू बारणे

८७. मा.बारणे माया संतोष

८८. मा.ओव्हाळ शेखर अशोक

८९. मा.यमुनाताई रमणनाना पवार

९०. मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड

९१. मा.कलाटे स्वाती मयुर

९२. मा.चौंधे आरती सुरेश

९३. मा.बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

९४. मा.शितल विठ्ठल ऊर्फ नाना काटे

९५. मा.बोकड रामदास गेणभाऊ

९६. मा.जवळकर वैशाली राहुल

९७. मा.जगताप राजेंद्र गणपत

९८. मा.शितोळे शैलजा बाबुराव

९९. मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र

१००. मा.प्रशांत शितोळे

१०१. मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सन्नी

१०२. मा.काटे रोहितअप्पा सुदाम

१०३. मा.गायकवाड संध्या सुरदास

१०४. मा.काटे राजेंद्र भिकनशेठ

१०५. मा.शेंडगे आशा सुखदेव

१०६. मा.मोटे किरण बाळासाहेब

१०७. मा.संजय केशवराव काटे

१०८. मा.धुमाळ बाबासाहेब निवृत्ती

१०९. मा.गावडे हनुमंत बाळासाहेब

११०. मा.पाटील सुजित वसंत

१११. मा.बो-हाडे अरुण तुकाराम

११२. मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम

याशिवाय मा.राजीव जाधव - आयुक्त, मा.तानाजी शिंदे - अति.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.तळदेकर - मुख्य लेखापरिक्षक, मा.कांबळे- प्र.शहर अभियंता, मा.डॉ.अनिल रॉय - आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.भदाणे- उपसंचालक नगररचना, मा.भोसले - मुख्यलेखापाल, मा.गावडे -सह आयुक्त, मा.डोईफोडे, मा.गायकवाड, मा.कुलकर्णी, मा.दंडवते, मा.दुरगूडे - सहा.आयुक्त, मा.साळुंके - मुख्य उद्यान अधिक्षक, मा.सातव - प्र.शिक्षणाधिकारी (माध्यमिक), मा.सवणे, मा.काची, मा.तांबे, मा.पठाण, मा.पिरजादे, मा.घोडे, मा.कांबळे, मा.गटटूवार - कार्य.अभियंता, मा.बोदडे - प्रशासन अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-----------

**मा.महापौर** - उपस्थित मा.नगरसेवक व नगरसेविका, आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, जम्मू काश्मिरमधील उरी येथे लष्कराच्या कॅम्पवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यात व सुकमा जिल्हयात नक्षलवाद्यांच्या हल्ल्यात शहीद झालेले जवान आणि पाकीस्तान येथील पेशावर शहरातील सैनिक शाळेतील विद्यार्थी व नागरीकांवर तालीबानी दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्यात मृत्यूमुखी पडलेले विद्यार्थी, शिक्षक, नागरीक, बॅ. ए.आर. अंतुले - माजी मुख्यमंत्री, मुरली देवरा - ज्येष्ठ नेते व माजी केंद्रीय मंत्री, †›.दत्ताजी खानविलकर - माजी मंत्री, उदयसिंहराव गायकवाड - माजी मंत्री, लक्ष्मण उर्फ अण्णा जोशी - माजी खासदार, सूर्याजीराव उर्फ चिमणराव कदम - माजी आमदार, सितारादेवी - प्रख्यात नृत्यसम्राज्ञी, देवेन वर्मा - प्रसिद्ध अभिनेते, चंद्रकांत खोत - प्रख्यात ज्येष्ठ साहित्यीक, पद्मजा फाटक - ज्येष्ठ साहित्यीक, नयनतारा - मराठी चित्रपटसृष्टी आणि मालिकांमधील ज्येष्ठ अभिनेत्री, श्याम पोंक्षे - मराठी नाट्य अभिनेते, फिल ह्युज - ऑस्ट्रेलियन युवा क्रिकेटपटू, अंबादास कांबळे - वृत्तपत्र छायाचित्रकार यांचे दु:खद निधन झाल्याने त्यांना श्रध्दांजली अर्पण करुन मंगळवार दि.२३/१२/२०१४ रोजी दुपारी २.०० पर्यंत सभा तहकूब करणेत यावी अशी सूचना मी मांडते.

**मा.सविता साळूंके** - मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देते.

**मा.महापौर** - श्रध्दांजली वाहणेसाठी सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे रहावे.

( सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली )

**मा.धनंजय आल्हाट -** मा.महापौर साहेब, समाविष्ट गावास विशेष पॅकेजसंदर्भात निवेदन दिलेले आहे त्याचा खुलासा व्हावा.

**मा.महापौर -** दि.२३/१२/२०१४ रोजी याबाबत चर्चा करता येईल. सर्वांच्या संमतीप्रमाणे मंगळवार दिनांक २३/१२/२०१४ रोजी दुपारी २.०० पर्यंत सभा तहकूब करण्यात येत आहे.

(धराडे शकुंतला भाऊसाहेब)
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८

**<u>पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८</u>**

**<u>मा.महापालिका सभा</u>**

**<u>कार्यपत्रिका क्रमांक - ३८.</u>**

**<u>सभावृत्तांत</u>**

**<u>(दिनांक २०/१२/२०१४ ची तहकूब सभा)</u>**

<u>दिनांक - २३.१२.२०१४</u> <u>वेळ - दुपारी २.०० वाजता</u>

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची (माहे डिसेंबर २०१४) दिनांक २०.१२.२०१४ ची तहकूब मा.महापालिका सभा मंगळवार दि.२३.१२.२०१४ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब - महापौर
२. मा.वाघेरे प्रभाकर नामदेव - उपमहापौर
३. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
४. मा.भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस.के. बापू
५. मा.भालेकर अरुणा दिलीप
६. मा.सौ.स्वाती प्रमोद साने
७. मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)
८. मा.सायकर अजय शंकरराव
९. मा.जाधव साधना रामदास
१०. मा.जाधव राहुल गुलाब
११. मा.आल्हाट मंदा उत्तम
१२. मा.काळजे नितीन प्रताप
१३. मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर
१४. मा.जगदीश शेट्टी
१५. मा.बाबर शारदा प्रकाश
१६. मा.बहिरवाडे नारायण सदाशिव
१७. मा.सौ.मंगलाताई अशोक कदम
१८. मा.उल्हास शेट्टी

१९. मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर

२०. मा.पवार संगीता शाम

२१. मा.बो-हाडे शुभांगी संजय

२२. मा.भारती फरांदे

२३. मा.आर.एस.कुमार

२४. मा.जावेद रमजान शेख

२५. मा.चारुशीला प्रभाकर कुटे

२६. मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर

२७. मा.राजू मिसाळ

२८. मा.नेटके सुमन राजेंद्र

२९. मा.तरस बाळासाहेब जयवंत

३०. मा.भोंडवे संगिता राजेंद्र

३१. मा.मोरेश्वर महादू भोंडवे

३२. मा.सूर्यवंशी आशा ज्ञानेश्वर

३३. मा.लोंढे गणेश नारायण

३४. मा.शमीम पठाण (पठाणबाई)

३५. मा.†›.संदीप गुलाब चिंचवडे

३६. मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

३७. मा.अपर्णा निलेश डोके

३८. मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे

३९. मा.जयश्री वसंत गावडे

४०. मा.प्रसाद शेट्टी

४१. मा.अविनाश (दादा) टेकावडे

४२. मा.काळभोर वैशाली जालिंदर

४३. मा.सौ.साळुंके सविता सुरेश

४४. मा.सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन

४५. मा.मासुळकर समीर मोरेश्वर

४६. मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडुरंग

४७. मा.सुपे आशा रविंद्र

४८. मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके

४९. मा.मोहिनीताई विलास लांडे

५०. मा.अजित दामोदर गव्हाणे

५१. मा.गोफणे अनुराधा देविदास

५२. मा.जालिंदर (बाप्पु) शिंदे

५३. मा.गव्हाणे सुरेखा शंकर

५४. मा.श्रध्दा बाजीराव लांडे

५५. मा.†›.नितीन ज्ञानेश्वर लांडगे

५६. मा.लोंढे शुभांगी संतोष

५७. मा.विश्वनाथ विठोबा लांडे

५८. मा.ननवरे जितेंद्र बाबा

५९. मा.भोसले राहूल हनुमंतराव

६०. मा.पालांडे सुजाता सुनिल

६१. मा.बहल योगेश मंगलसेन

६२. मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद

६३. मा.कदम सदगुरु महादेव

६४. मा.गिता सुशील मंचरकर

६५. मा.कैलास महादेव कदम

६६. मा.छाया जगन्नाथ साबळे

६७. मा.आसवाणी सविता धनराज

६८. मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

६९. मा .ताम्हणकर प्रमोद रघुनाथ

७०. मा.काळे विमल रमेश

७१. मा.पाडाळे निता विलास

७२. मा.विनोद जयवंत नढे

७३. मा.तापकीर अनिता मच्छिंद्र

७४. मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे

७५. मा.विमलताई सुरेश जगताप

७६. मा.अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा पवार

७७. मा.बारणे निलेश हिरामण

७८. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

७९. मा.ओव्हाळ शेखर अशोक

८०. मा.यमुनाताई रमणनाना पवार

८१. मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड

८२. मा.कलाटे स्वाती मयुर

८३. मा.नांदगुडे विलास एकनाथ

८४. मा.बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

८५. मा.शितल विठ्ठल ऊर्फ नाना काटे

८६. मा.बोकड रामदास गेणभाऊ

८७. मा.जवळकर वैशाली राहुल

८८. मा.जगताप राजेंद्र गणपत

८९. मा.शितोळे शैलजा बाबुराव

९०. मा.जगताप नवनाथ दत्तु

९१. मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र

९२. मा.अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे

९३. मा.जम सोनाली पोपट

९४. मा.प्रशांत शितोळे

९५. मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सन्नी

९६. मा.गायकवाड संध्या सुरदास

९७. मा.काटे राजेंद्र भिकनशेठ

९८. मा.शेंडगे आशा सुखदेव

९९. मा.मोटे किरण बाळासाहेब

१००. मा.संजय केशवराव काटे

१०१. मा.धुमाळ बाबासाहेब निवृत्ती

१०२. मा.गावडे हनुमंत बाळासाहेब

१०३. मा.पाटील सुजित वसंत

१०४. मा.बो-हाडे अरुण तुकाराम

याशिवाय मा.तानाजी शिंदे - अति.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.तळदेकर - मुख्य लेखापरिक्षक, मा.कांबळे - प्र.शहर अभियंता, मा.पाटील - सह शहर अभियंता, मा.भोसले - मुख्यलेखापाल, मा.गावडे - सह आयुक्त, मा.डोईफोडे, मा.गायकवाड, मा.कुलकर्णी, मा.दंडवते, मा.फुंदे, मा.दुरगूडे - सहा.आयुक्त, मा.साळुंके - मुख्य उद्यान अधिक्षक, मा.सातव - प्र.शिक्षणाधिकारी (माध्यमिक), मा.दुधेकर, मा.निकम, मा.सवणे, मा.इंगळे, मा.तांबे, मा.चव्हाण, मा.साळवी, मा.पठाण, मा.गलबले, मा.घोडे, मा.केदारी, मा.कांबळे, मा.गटटूवार, मा.शेख - कार्य.अभियंता, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-----------

**मा.महापौर** - उपस्थित मा.नगरसेवक व नगरसेविका, आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

मा.महापालिका सभा क्रमांक - ३६ दिनांक २०/१०/२०१४ व १०/११/२०१४ चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

**मा.नगरसचिव -** मा.महापौर साहेब, प्रश्नोत्तरे- मा.दत्तात्रय साने यांना विचारावयाचे प्रश्न.

**मा.महापौर -** मा.दत्तात्रय साने यांना विचारावयाचे प्रश्न घेणेत यावेत.

**मा.दत्तात्रय साने -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह व पत्रकार बंधु. मी दि.२६/११/२०१४ रोजी येणा-या जी.बी.मध्ये प्रश्न विचारलेले होते. त्यात माझा पहिला प्रश्न असा होता की, रोपवाटीका चिखली गावठाणमधील रुम ठेकेदाराच्या कर्मचा-यांना राहण्याची परवानगी दिली आहे का ? -हषिकेश रविंद्र पुजारी वय वर्ष ५ दि.२१/१०/२०१४ वार मंगळवार वेळ सायंकाळी ६ ते ११ दरम्यान दुर्घटना घडली याला कारणीभूत कोण ? म.न.पा. स्थापत्य की म.न.पा. उद्यान ? पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत किती उद्याने आहेत ? त्यामध्ये ठेकेदारी पध्दतीने चालविण्यासाठी दिलेली किती आहेत ? सर्व उद्यानामध्ये २४ तास सुरक्षा रक्षक आहेत का ? प्रत्येक सुरक्षा रक्षकास अधिकृत राहण्याची व्यवस्था केली आहे का ? केली असल्यास कोठे केली आहे ? आयुक्त साहेब याठिकाणी जी उत्तर दिलेली आहेत ती सभागृहाची दिशाभूल करणारी उत्तरे दिलेली आहेत. मनपाच्या उदयानात असलेल्या वॉचमन रुम/ माळी हाऊसमध्ये सुरक्षा विभागाकडील कर्मचारी, उदयान विभागाकडील कर्मचारी व उदयान देखभाल करणारे ठेकेदाराचे कर्मचारी यांना राहण्यास देण्याचे १९९२ पासून प्रथा आहे. त्यानुषंगाने मा.आयुक्त सो. यांचे मान्यतेने उदयान/२/कावि/३३०/२०१४ दिनांक १०/१/२०१४ अन्वये परिपत्रक पारित करणेत आले आहे. मा.आयुक्त साहेब यांच्या मान्यतेने हा ठराव पाठविलेला आहे. १९९२ पासून आपण या कर्मचा-यांना आपले जे उदयान आहेत तेथे राहण्यासाठी परमिशन देतो. तो ठराव काय आहे, उत्तर दिलेले आहे परंतु ठराव काय आहे हे दाखवावे. दि. १०/१/२०१४ अन्वये एक परिपत्रक पारीत करण्यात आलेले आहे. हे परिपत्रक

काय पारीत करण्यात आलेले आहे हे सांगता येईल का ? कारण त्याच्यावरच मला पुढे बोलायचे आहे. आणि मी प्रश्न काय विचारला व त्याच उत्तर काय दिले.

**मा.सुरेश साळूंके (मुख्य उदयान अधिक्षक)** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. मनपाची जी उदयान आहेत त्यामध्ये वॉचमेन क्वॅार्टर आहेत त्यामधील माळी हाऊस संबंधीत वॉचमेनला किंवा तेथील केअर टेकरला देखभालीसाठी देण्याची प्रथा १९९२ पासून आहे. ते १९९२ पासून वॉचमेन किंवा केअर टेकरला देतो. याचे परिपत्रक मा.परदेशी साहेब असताना काढलेले होते. त्या परिपत्रकानुसार निवासस्थान असलेल्या उदयानांची २४ तास संरक्षाणाची जबाबदारी प्राधान्याने मनपा सुरक्षारक्षक, मनपा कर्मचारी व संबंधीत उदयानाचे ठेकेदार यांच्यावर विनामोबदला सोपविणेत यावी. उदयान संरक्षणाच्या बदल्यात घरभाडे, पाणी, वीजवापर, मिळकतकर आकारला जाणार नाही. उदयान संरक्षण देखभालीचा आणि सदर निवासस्थानाचा वापर केवळ मनपा कामकाजासाठी निवास म्हणून करावयाचा आहे. त्याठिकाणाहून बदली झाल्यास निवासस्थान रिक्त करावयाचे आहे. दुसरा ठराव महापालिका सभेने केलेला आहे तो उदयानामधील माळी हाऊस आहेत ते वॉचमेन, सुरक्षारक्षकांना दयायचे तो ठराव महापालिकेनी केलेला आहे. मा.महापालिका सभा ठराव क्र.५८७३ दिनांक २४/७/२००६ अन्वये त्यानुसार उदयानातील वॉचमेन रुम ज्या आहेत त्या फक्त सुरक्षारक्षक कर्मचा-यांना विनामोबदला दयायची असे आहे.

**मा.दत्तात्रय साने** - मा.महापौर साहेब, १०/१/२०१४ रोजी परिपत्रक पारित करणेत आलेले आहे व मी प्रश्नोत्तर २६/११/२०१४ रोजी विचारलेले आहेत. १०/१/२०१४ रोजी कसले परिपत्रक काढलेले आहे.

**मा.सुरेश साळूंके (मुख्य उदयान अधिक्षक)** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. दि.१०/१/२०१४ जे परिपत्रक काढल आहे ते उदयानाच्या धोरणाबाबतचे आहे. उदयाना मधील ज्या रुम आहेत त्या रुम देणेबाबतचे परिपत्रक पारित केले आहे. निवासस्थान असलेल्या उदयानाची २४ तास संरक्षणाची जबाबदारी प्राधान्याने मनपा सुरक्षारक्षक, मनपा कर्मचारी व संबंधीत उद्यानाचे ठेकेदार यांच्यावर विनामोबदला सोपवणेत यावी व त्याबाबतचे घरभाडे, वीजवापर किंवा मिळकतकर आकारले जाणार नाही. १९९२ पासून ही आपली प्रथा आहे.

**मा.दत्तात्रय साने -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब मी सभागृहामध्ये एक ठराव देतो की पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये या सभागृहापासून जेवढे काही आपले बांधकाम आहेत त्याठिकाणी आपण झोपडपट्टी पुर्नवसन करतोच आहोत याठिकाणी सुध्दा पुर्नवसन करण्यासाठी हरकत नाही ही प्रथा करुन टाकूनां आपण. १९९२ ला काही केल म्हणजे ते आज चालू ठेवायचं. उद्यानामध्ये कुठलेही मनपाचे कर्मचारी राहत नाही. आपले काही कर्मचारी, आपल्या काही

लोकांनी तिथं भाडयाने रुम दिलेल्या आहेत. भाडे घ्यायची पण प्रथा आपण चालू केली की काय ? माझा प्रश्न असा आहे की परवानगी दिलेली आहे का ? माझा दुसरा प्रश्न असा आहे की, -हषिकेश रविंद्र पुजारी वय वर्ष ५ दि.२१/१०/२०१४ वार मंगळवार वेळ सायंकाळी ६ ते ११ दरम्यान दुर्घटना घडली याला कारणीभूत कोण ? म.न.पा. स्थापत्य की म.न.पा. उद्यान ? याच अनुषंगाने प्रश्न आहे की, वरचे क्वॉर्टर रहायला दिलेले आहे, चिखलीची जी रोपवाटीका आहे ते ज्या कर्मचा-याला किंवा कोणालातरी आपण ठेका दिलेला आहे, त्या ठेकेदाराचे वॉचमेन आणि नर्सरीचा काहीही संबंध नसताना हा माणुस तेथे राहण्यास गेलेला आहे आणि पाण्याच्या टाकीमध्ये तो मुलगा पडून मृत्यूमुखी पडलेला आहे याला जबाबदार कोण ? असा प्रश्न विचारलेला आहे त्याचे सरळ सरळ उत्तर दिलेले आहे की पोलीस तपास चालू आहे. माझा प्रश्न होता याला जबाबदार कोण मग ते स्थापत्य असेल किंवा उदयान विभाग असेल. या माध्यमातून प्रश्न विचारला त्याचे उत्तर देताना आपण सांगीतले की त्याचा पोलीस तपास चालू आहे, पोलीस तपास चालू करताना तुम्ही ज्यांच्यावर एफआयआर दाखल केला तो पी.एम.गायकवाड आहे त्याचा याच्याशी काहीही संबंध नाही व ज्याचा संबंध आहे, ज्याला ठेका दिला तो पी.के. भोसले त्याला यांनी सोडून दिलेलं आहे. आमचतर म्हणणं आहे की साळूंकेवर गुन्हा दाखल व्हायला पाहिजे होता. खालच्या कर्मचा-यांवर का गुन्हा दाखल होतोय. म्हणजे चोरी करायची हयांनी, ठेकेदार नेमायचे हयांनी, पैसे खायचे हयांनी जे काय निर्णय घ्यायचे ते हयांनी आणि खालच्या कर्मचा-यांना फाशी दयायचं काम यांनी यामध्ये केलेले आहे. पी.एम.गायकवाडचा संबंध नसताना त्यांच्यावर एफआयआर दाखल झालेला आहे. यांच्यावर एफआयआर का दाखल झालेला नाही. महापौर साहेब माझी विनंती आहे की, साळूंके साहेबावर व भोसले साहेब यांच्यावर एफआयआर दाखल व्हावा अशी माझी विनंती आहे, त्यांच्यावर एफआयआर दाखल करा, त्यांची चौकशी करा. विनाकारण कर्मचा-याला मारण्यात काय पॉईंट आहे. तो माळी या कर्मचा-याच बायपास झालेल आहे, तो दोन-तीन महिन्यानी रिटायर्ड होणार आहे. आता तो सहा महिन्यापुर्वी तिथं आलेला आहे. सब ठेकेदाराला ज्यांनी ठेका दिलेला आहे तो भोसले यांनी ठेका दिलेला आहे. यांना जबाबदार धरायच सोडून तो नवीन कर्मचारी आहे बदली होवून दोन महिन्यापुर्वी तिथं गेलेला आहे आणि त्याच्यावर तुम्ही गुन्हा दाखल करताय. त्याचा काही संबंध नसताना गुन्हा दाखल होतोय. आपली चमडी बचावण्यासाठी साळूंकेनी हे बाकीच्याना फाशीला दिलेले आहे. महापौर साहेब, मी या सभागृहामध्ये आपल्याला विनंती करतो की पहिली एफआयआर साळूंके यांच्यावर दाखल व्हावी, साळूंकेच त्याला जबाबदार आहेत. माझा तीसरा प्रश्न असा आहे की, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत किती उदयाने आहेत त्यामध्ये ठेकेदारी पध्दतीने चालविणेसाठी दिलेली किती आहेत. आताच उत्तर दिलेले आहे की पिंपरी चिंचवड मनपाची १५९ विकसीत आणि १२ अशी एकूण १७१ उदयाने आहेत त्यापैकी १०६ उदयाने ठेकेदारी पध्दतीने देखभालीस देण्यात आलेली आहेत. ही उदयान

देखभालीसाठी देतांना ती कशा पध्दतीने दिलेली आहेत. साध्या सोप्या भाषेत उत्तर दिलेले आहे की, ठेकेदारी पध्दतीने देखभालीस देण्यात आलेली आहेत. महापौर साहेब, माझी विनंती आहे की हे १७१ उदयान आहेत त्यापैकी १०६ उदयान ठेकेदारी पध्दतीने दिलेली आहेत मग ही बाकीचे उदयान कोण चालवते. तर ते आपले कर्मचारी चालवतात. चिखलीमध्ये ठेका दयायचा काही संबंध नव्हता, चिखलीमध्ये आपले कर्मचारी आहेत. आपले कामगार तेथे काम करतात. तेथे हे लोक काम करत असताना हा ठेका द्यायची काय गरज आहे. काही गरज नसताना त्यांनी ते उदयान त्यांच्या हितचिंतकाना जाणुनबूजून चालविण्यासाठी दिलेलं आहे. माझा विषय आहे की तो मुलगा मेला त्या उदयानाचा ठेका चिखलीच्या उदयानाच्या बाहेरचा होता. कंपौंडच्या बाहेर वृक्ष लावण्यासाठी त्यांना ठेका दिलेला आहे. असं असताना तो मुलगा त्या टाकीच्या तेथे यायच कारण काय ? आपल कंपौड त्या टाकीला होत का ? तो मुलगा पडला त्या टाकीला झाकण होते का ? ती टाकी बांधली कधी, ती टाकी ९७-९८ च्या दरम्यान बांधली त्यावेळेला तीला झाकण होते का नाही ? ती टाकी आपल्यासाठी शेफ्टी आहे का नाही ते काम कोणाचे आहे. ज्यावेळेस स्थापत्यानी ती टाकी बांधुन हॅण्डवर्क केली त्यावेळेला त्यास झाकण होते का ? त्या टाकीत तो मुलगा पडेपर्यंत तेथील लोकांचा निष्काळजीपणा आहे, महापालिकेचा निष्काळजीपणा आहे. विशेष करुन याचा उदयान विभागाशी जास्त संबंध आहे. म्हणून महापौर साहेब माझी विनंती आहे की, या टाकीत मुलगा पडून मेलेला आहे त्याची जबाबदारी साळूंके साहेबांवर टाकावी अशी मी विनंती करतो. तीसरा प्रश्न असा आहे की, सर्व उदयानामध्ये २४ तास सुरक्षा रक्षक आहेत का ? असा माझा प्रश्न होता त्याचे उत्तर दिलेले आहे मनपाचे एकुण १७१ उदयाने आहेत पैकी २३ उदयानात सुरक्षारक्षक आहेत. हे कोणाचे सुरक्षारक्षक आहेत, हे पिंपरी चिंचवड महापालिकेचे आहेत का, का ठेकेदारी पध्दतीचे आहेत, कोणाचे आहेत. त्याचे उत्तर नाही. हे सगळे उत्तर देताना सभागृहाला फसवेगिरीचे उत्तर दिलेले आहेत. जर १७१ उदयाने आहेत मग १४८ उदयानाचे काय ? त्यांना सुरक्षारक्षक नाहीत, त्यांच्या देखभालीसाठी कोणी नाही. असं आहे का नक्की. असं असेलतर त्या उदयानाचे काय. कोणाच्या माध्यमातून ती चालू आहेत हे दिलेले उत्तर सरळ सरळ चुकीचे आहेत. माझ्या प्रश्नाशी संबंधीत एकही उत्तर नाही, एकही अपेक्षीत उत्तर नाही. या उत्तरावर काय बोलणार. या विषयाला मला जे अपेक्षीत उत्तर पाहिजे ते एक सुध्दा उत्तर नाही. जर आपले १७१ उदयान आहेत तर १४८ उदयानाचं काय ? तिथं ती उदयान जागेवर नाहीत का ? त्याठिकाणी ती उदयान डेव्हलप नाहीत का ? याचे उत्तर दिलेले नाही. म्हणून या विषयाचा निषेध करावा असे वाटू लागलेले आहे. माझा पुढचा प्रश्न असा आहे की, प्रत्येक सुरक्षा रक्षकास अधिकृत राहण्याची व्यवस्था केली आहे का **?** केली असल्यास कोठे केली आहे **?** सुरक्षा रक्षकास अधिकृत राहण्याची व्यवस्था केली नाही असे उत्तर दिलेले आहे. ८ उदयानात निवासी सुरक्षा रक्षक नियुक्त केलेले आहेत. १७१ पैकी ८ उदयानामध्ये सुरक्षारक्षक आहेत तर मग बाकी

उदयानाचे काय ? नागरीकांचे म्हणणे आहे की उदयानामध्ये फिरण्यासाठी नागरीक, महिला येत असतात सकाळी किंवा संध्याकाळी फिरण्यासाठी, त्यावेळेला त्यांची सुरक्षा कोणाच्या ताब्यात आहे म्हणजे हा टोटल खेदजनक विषय आहे. ८ उदयानामध्ये निवासी सुरक्षारक्षक आहेत बाकीचे उदयान वा-यावर का सोडले. म्हणजे मला वाटत साळूंके साहेब त्या पदावर बसण्याच्या लायक नसतील असं मला वाटतय. बाकीचे उदयान डेव्हलप केलेले आहेत त्याठिकाणी चो-या मा-या झाल्यातर काय. तेथे आपण जाळया बसवलेल्या आहेत, आठ उदयान सोडलेतर बाकी उदयान कुठच व्यवस्थित नाहीत. मग उदयान अधिक्षक काय करतात, उदयान अधिक्षकाना ठेवल कशासाठी ? मनपाचा पगार घेण्यासाठी. म्हणून आयुक्त साहेब माझी विनंती आहे की या प्रश्नांच मला समाधानकारक उत्तर मिळालेल नाही. म्हणून ज्यांनी उत्तर दिलेले आहे त्यांचा पहिल्यांदा निषेध नोंदवला पाहिजे. समर्पक उत्तर असतील तरच व्यवस्थित बोलता येईल. पुढचा प्रश्न असा आहे की, किती उद्यानामध्ये सुरक्षा रक्षकासाठी किंवा अन्य कारणासाठी रुम आहेत का **?** ज्या उद्यानामध्ये सध्या काही नागरिक राहतात ते अधिकृत आहेत का **?** अनधिकृत असल्यास परवानगी कोणी दिली आहे **?** अगोदरच्या प्रश्नाच्या उत्तरात सांगीतले की ८ उदयानामध्ये निवासी सुरक्षारक्षक नियुक्त केलेले आहेत आणि याठिकाणी सांगीतल ७४ उदयानात वॉचमन रुम आहेत. या प्रश्नाच्या उत्तराचा ताळमेळ सांगावा. हे कसे जुळवायचे. कुठल्या प्रश्नाला कुठले उत्तर दिलेले आहे. उत्तर जुळतय का ? ज्या उदयानामध्ये सध्या काही नागरीक राहतात ते अधिकृत आहेत का ? याचे उत्तर दिलेले आहे, होय. सध्या उदयानात जे रहातात ते नागरीक नसून मनपाचे सुरक्षा कर्मचारी / उदयान विभागाचे कर्मचारी व उदयान देखभाल ठेकेदाराचे कर्मचारी आहेत. सदरचे कर्मचारी मा.महापालिका सभा ठराव क्र ५८७३ दिनांक २४/७/२००६ अन्वये आदेश क्र. सुवि /४/कावि/३२५/२००७ दिनांक २१/११/२००७. नगरसचिव यांना मी सांगीतले होते की हा ठराव देण्याची व्यवस्था करावी. हे सगळे दिलेले उत्तर चुकीचे आहेत. एक सुध्दा उत्तर बरोबर नाही. परत मला परमिशन दयाव व याची सविस्तर उत्तर दयावीत. यात व्यवस्थित उत्तर दिलेली नाहीत. परिपत्रक क्र. उदयान/२/कावि/३३०/२०१४ दिनांक १०/१/२०१४ नुसार विभागाचे सहमतीने राहत आहे हे परिपत्रक काय काढलेले आहे हे दाखवावे. याचे सुध्दा एकही उत्तर समर्पक नाही. मी सांगीतलेल होत की मला हे सगळे ठराव पाहिजेत, याचा ठराव काय आहे हे मला पाहिजे होता. ठरावच याच्या बरोबर दिलेले नाहीत म्हणजे सभागृहाचा वेळ चुकीचे उत्तर देवून सभागृहाची दिशाभूल करण्याच काम केलेल आहे. हे परत उत्तर देणार का ?

**मा.सुरेश साळूंके (मुख्य उदयान अधिक्षक)** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. आपल्याकडचे एकूण १७१ उदयान आहेत त्यापैकी ७४ उदयानामध्ये वॉचमेन क्वॉर्टर किंवा माळी हाऊस आहे. यापैकी जी ठेकेदारी पध्दतीचे २३ उदयानात सुरक्षारक्षक आहेत त्यापैकी ८ उदयानात निवासी सुरक्षारक्षक आहेत, ८ उदयानात आपल्या उदयान विभागाचे

कर्मचारी राहतात ते केअर टेकर म्हणून काम करतात. ठेकेदाराना उदयान दिलेले आहेत ते ३९ उदयानामध्ये ठेकेदाराचे ६३ कर्मचारी राहतात.

**मा.दत्तात्रय साने -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. हा मयत झालेला मुलगा कोणाचा होता. आपण त्याला परमीशन दिले होतं का ? ऋषीकेश पुजारी हा मयत झालेला होता त्याला राहण्यासाठी परमीशन दिलेले होतं का ? कोणी ठेका दिलेला आहे आणि संबंधीत अधिकारी कोण ?

**मा.सुरेश साळूंके (मुख्य उदयान अधिक्षक)** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. कालची जी घटना घडली, चिखली रोपवाटीकेचा ठेका दिलेला होता तो जिव्हाळा महिला विकास प्रतिष्ठान यांना दोन वर्षासाठी निवीदा काढून दिलेला होता. नि.नो.क्र. १३-१/२-२०१२/१३ ही निवीदा काढून आदेश क्र. उदयान/४/कावि/१८४/१३ दि.१४/५/१३ अन्वये हा ठेका दिलेला होता. तेथील वृक्षारोपण देखभाल करणे, पाणी देणे या कामाचा ठेका दिलेला होता.

**मा.दत्तात्रय साने-** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. त्याठिकाणी महापालिकेचे अधिकृत कर्मचारी किती आहेत.

**मा.सुरेश साळूंके (मुख्य उदयान अधिक्षक)** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. हा ठेका दिला होता तो तेथील साईडच्या वृक्षारोपणाचा दिलेला होता. आपले कर्मचारी रोपवाटीकेसाठी होते. आपले गायरान तेथे मोठे आहे. १५ एक्करचे गायरान आहे तेथील रोपवाटीकेमध्ये आपले कर्मचारी आहेत आणि रोपवाटीकेच्या बाहेरच्या बाजूला जे वृक्षारोपण केलेले होतं ते पाच हजार वृक्षारोपण यांना देखभालीसाठी दिलेले होते.

**मा.दत्तात्रय साने -** मा.महापौर साहेब, तो मुलगा बाहेर असताना आतमध्ये टाकीत आला कसा काय ? ती टाकी आतमध्ये होतीना. ती टाकी तुमच्या ताब्यात आहे मग तो मुलगा तिथं गेला कसा काय **?**

**मा.सुरेश साळूंके (मुख्य उदयान अधिक्षक)** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. आपली जी नर्सरी आहे ती एका बाजूला आहे त्याच बाजूने पुढच्या बाजूला आपण वृक्षारोपण केलेलं आहे. बाहेरच्या बाजूने वृक्षारोपण केलेले आहे स.नं. एकच आहे फक्त एका साईडला नर्सरी आहे आणि एका साईडला वृक्षारोपण आहे.

**मा.दत्तात्रय साने -** मा.महापौर साहेब, हा मुलगा मयत झाला त्याला जबाबदार कोण हा माझा प्रश्न आहे. हा ठेका देताना कोण होते, पी.एम.गायकवाड होते का भोसले होते. यांना ठेका दिला त्यावेळेस अधिकृत अधिकारी कोण होते.

**मा.सुरेश साळूंके (मुख्य उदयान अधिक्षक)** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. आपण जो ठेका दिला तो त्यावेळेस महापालिकेमार्फत निवीदा मागवून दिलेला आहे. त्यावेळेला त्याठिकाणी सुपरवायझर एन.डी.माळी आणि भोसले हे होते.

**मा.दत्तात्रय साने -** मा.महापौर साहेब, कोणाच्या सहीने ठेका दिलेला आहे. त्याला अधिकृत कोण आहे. तुम्ही आणि भोसले.

**मा.सुरेश साळूंके (मुख्य उदयान अधिक्षक)** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. आपण निवीदा आयुक्त आणि अति.आयुक्त यांच्या अधिकारात काढतो. तसे आम्हांला निवीदा काढण्याचे अधिकार नाहीत.

**मा.दत्तात्रय साने -** मा.महापौर साहेब, त्या टाकीमध्ये मुलगा मेला. ही निवीदा दोन वर्षापुर्वी तुम्ही ओपन केली त्यावेळेला तेथे कार्यकारी अभियंता कोण होते. भोसले का पी.एम.गायकवाड, कोण होते.

**मा.सुरेश साळूंके (मुख्य उदयान अधिक्षक)** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. त्यावेळचे जे सुपरवायझर होते ते खाली एन.डी.माळी होते त्यांच्यावर भोसले होते त्याच्यावर उदयान अधिक्षक म्हणून पी.एम.गायकवाड होते त्यांच्यावर मी होतो.

**मा.दत्तात्रय गायकवाड -** मा.महापौर साहेब, यात तुमचे नाव का आले नाही, याला जबाबदार कोण **?**

**मा.सुरेश साळूंके (मुख्य उदयान अधिक्षक)** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. एफआयआर दाखल केलेला आहे, त्यावेळेस जे जबाब झाले त्या जबाबामध्ये माझा सुध्दा जबाब झालेला आहे. असा काही गैरसमज करण्याचे कारण नाही. सगळयांचे जबाब झालेत. माझ्या माहितीप्रमाणे अजून एफआयआर दाखल झालेला नाही फक्त जबाब घेतलेले आहेत.

**मा.दत्तात्रय साने -** मा.महापौर साहेब, गायकवाड, माळी आणि ठेकेदार बाई यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल झालेला आहे. त्यावेळेस हेड म्हणून तुमची जबाबदारी नाही का **?** फक्त जबाब झाला की झाल का **?**

**मा.सुरेश साळूंके (मुख्य उदयान अधिक्षक)** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. त्या टाकीमध्ये मुलगा पडलेला आहे. आतापर्यंतच्या गार्डनच्या इतिहासात पहिल्यांदाच असं घडलेले आहे. आम्ही लगेचच कार्यकारी अभियंता यांना सांगून त्या टाकीला झाकण बसविलेल आहे.

**मा.दत्तात्रय साने -** मा.महापौर साहेब, टाकीला झाकण नाही ते बसवावे म्हणून आपण स्थापत्य विभागाला पत्रव्यवहार केला का **?**

**मा.सुरेश साळूंके (मुख्य उदयान अधिक्षक)** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. स्थापत्य-उदयान हा विभाग फक्त उदयानाची कामे करण्यासाठी आहे. पत्रव्यहार जरी नाही केलातरी त्यांचे ते काम करायचे होते. पत्रव्यवहार करावा असे नाही. तो विभागच आपल्यासाठी आहे.

**मा.दत्तात्रय साने -** मा.महापौर साहेब, त्यानी काम केले पाहिजे असे उत्तर देणे शोभते का. ज्यावेळेला ती टाकी बांधली त्यावेळेला झाकण होतेनां. का बिगर झाकणाची टाकी तुमच्या ताब्यामध्ये दिली. पुर्वी त्याला झाकण नव्हते का ? याला जबाबदार कोण ? स्थापत्य विभाग का उदयान विभाग. हा प्रश्न आहे. तुम्ही सरळ सरळ सांगतात याचा पोलीस तपास चालू आहे. तो मुलगा मेला त्याला जबाबदार कोण ? जो मुलगा मेलेला आहे तो आपल्या प्रिमायसेसमध्ये मेला याची जबाबदारी कोणी घ्यायची. हा प्रश्न आहे. या प्रिमायसेसमध्ये तो मुलगा मयत झालेला आहे दु:ख याच आहे की त्या माणसाला दोन मुली आहेत आणि एकुलता एक मुलगा आहे. आणि अशी घटना घडत असताना साळूंके यांना मी ९.३० वाजता फोन केला व सांगीतले असा असा प्रकार घडलेला आहे तुम्ही स्पॉटवर या परंतु ते आले नाहीत, वायसीएमला सुध्दा भेटले नाहीत. दुर्घटना आपल्या प्रिमायसेसमध्ये घडली असताना तिथं कोणाला भेटायची यांची जबाबदारी नव्हती का ? एवढे निगरगट्ट अधिकारी झालेले आहेत. परवा प्राधिकरणात एक बिल्डींग पडली, आयुक्त साहेबांनी तिथं व्हिजीट केली. सेक्टर १६ मध्ये पाण्याच्या टाकीमध्ये एक महिला पडली अशी घटना घडली तेथे आपल्या प्रिमायसेसमध्ये नसताना बिल्डरची चुक असताना आपले आयुक्त व सगळा स्टाफ गेला आणि याठिकाणी आपल्या प्रिमायसेसमध्ये एक मुलगा मयत होतोय येथे आपली जबाबदारी नाही का ? ही जबाबदारी कोणाची आहे याचे उत्तर दयावे.

**मा.तानाजी शिंदे (अति.आयुक्त)** - मा.महापौर साहेब, सन्मा.सभागृह. चिखली गावठाणालगतची जी आपली रोपवाटीका आहे त्यामध्ये जी घटना घडली ती दुर्दैवी आहे. आता जो प्रशासना मार्फत खुलासा केला गेलेला आहे, त्यामध्ये एक गोष्ट प्रकर्षानं जाणवते की तेथे ठेकेदाराचा जो कर्मचारी आहे तो राहत होता ही कल्पना उदयान विभागाला होती. १९९२ साला पासून आपल्याकडे उदयानामध्ये जे माळीहाऊस असतील किंवा सुरक्षा रक्षकासाठी राहण्यासाठी ज्या जागा आहेत त्या वापरल्या जात आहेत ही वस्तुस्थिती आहे. मध्यंतरी बेंगलोरला गार्डनच्या निमित्तानं जी आम्ही व्हिजीट दिली होती त्याठिकाणी असे निदर्शनास आले की ठेकेदाराचे जे लोक आहेत, जे देखभालीचे कामकाज करतात त्यांचेच लोक वॉचमेन रुमचा वापर करत असतात. त्याच धर्तीवर आपल्या सर्व उदयानामध्ये जी राहण्याची व्यवस्था आहे ती वापरली जाते. या बागेमध्ये ही जी घटना घडलेली आहे हा एक अपघात आहे. यामध्ये पोलीसानी फक्त त्याची दखल घेतलेली आहे त्याची चौकशी केलेली आहे त्याच्यावर चारशीट वगैरे काही दाखल

नाही. त्यामुळे तो एक नैसर्गिक आकस्मिक अपघात म्हणून नोंदला गेलेला असावा. माझ्यासमोर कागद नाहीत मी त्यात बघीतल नाही परंतु तो आकस्मिक अपघात असावा असे मला वाटतं आणि त्यासाठी कोणाला जबाबदार धरणं तितकस योग्य नाही असं मला वाटतं.

**मा.दत्तात्रय साने -** मा.महापौर साहेब, म्हणजे तुम्हांला असं वाटत की तो एक आकस्मिक अपघात आहे उदया सभागृहामध्ये मी त्या डायसवरुन काहीतरी चुकीच केलंतर असं होवू शकतं का हा अपघात आहे म्हणून. मी तिथं आलो आणि काहीतरी केलतर तुम्ही म्हणणार का हा अपघात आहे. निर्दयी उत्तर देता साहेब, निर्दयी. ज्यांच्या पोटचा गोळा मेला त्यांना समजते. हीच जर घटना आपल्या कोणाच्या घरात झाली असतीतर अस म्हणल असतं का ? आपल्या एखादया कर्मचा-यांची काही घटना घडली असतीतर तुम्ही अपघात म्हणाला असता का. म्हणजे तो ठेकेदारी पध्दतीचा माणूस आहे म्हणून तुम्ही त्याला अपघात म्हणतांय, चौकशीचे आदेश काढणार का, या विषयाची आम्ही चौकशी करु असे का म्हणत नाहीत. फौजदारी दाखल करु असे का तुम्ही उत्तर देत नाहीत. चुकीचे उत्तर देवून सभागृहाची दिशाभूल करु नका आमच्या प्रश्नाचे उत्तर सविस्तर देण्याचे तुम्ही टाळायच काम चालू केलेल आहे. महापौरांना विनंती आहे की या मुलाच्या बाबतीत स्पेशिफीक प्रशासनाला सांगावे, पोलीसांना आदेश दयावेत व जो कोणी दोषी असेल त्याच्यावर एफआयआर दाखल झाली पाहिजे. ज्याच्यामुळे ही घटना घडली त्याच्यावर फौजदारी गुन्हा दाखल झाला पाहिजे, असे मा.महापौर आपण आदेश दयावेत. माझा पुढचा प्रश्न असा होता की, सन २००७ पासून बिल्डराने किती गार्डन NOC दिली आहे **?** त्या बिल्डर्सची नावासह यादी देण्यात यावी **?** NOC देताणाचे नियम काय **?** ज्या वेळेस मनपा NOC देते त्या वेळेस त्यांनी लावलेली झाडे जगली आहेत कि नाही त्या ठिकाणी जाऊन प्रत्यक्ष पाहणी केली जाते का **?** बिल्डींग परमिशनचा पुर्णत्वाचा दाखला दिल्यानंतर त्या बिल्डींगमध्ये लावलेली झाडे आहेत का नाहीत ते पाहिले जाते का **?** ती झाडे जगली आहेत का **?** मेली आहेत का **?** परत दुस-या बिल्डींगसाठी वापरली गेली की काय त्याची खातरजमा केली जाते का **?** बिल्डर लोक झाडे लावतात त्यासंबंधी प्रश्न मी विचारलेले होते. सन २००७ पासून २०१४ पर्यंत ५५३८ लोकांना वृक्षप्राधिकरणाने एनओसी दिलेली आहे. माझ्या प्रश्नाला असे उत्तर दिलेले आहे की, महाराष्ट्र नागरी क्षेत्र झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ बांधकाम भूखंड क्षेत्रासाठी प्रकरण ५ कलम ९ (१) समुचित प्रमाणात झाडे लावणे १०० चौ.मी. एक वृक्ष. प्रकरण ५ कलम ११ (१) झाडांचे जतन करण्याची जबाबदारी प्रकरण ५ कलम ११ (२) ठेव घेण्याचा अधिकार. उपरोक्त नियमानुसार बांधकामास वृक्षसंवर्धन ना हरकत दाखला दोन वेळा देणेत येतो. १) बांधकाम चालू करताना २) बांधकाम पुर्णत्वाच्या वेळेस असा दोन वेळा दाखला देतो. मला काही गोष्टी निदर्शनास आणून दयायच्या आहेत की मला वाटते ५५३८ अ-सुचीमध्ये दिलेले आहे. त्यांना परमीशन दिलेले आहे त्यापैकी पुर्ण झालेले जे बांधकाम आहेत ज्याच्या पुर्णत्वाचा दाखला विकसकाला दिलेला आहे. आपण विकसकाला ज्यावेळेस दाखला देत असतो

त्यावेळेस मी विचारले होते की आपण पाहणी केली का ? ती झाडे जागेवर आहेत का ? का दुसऱ्या ठिकाणी लावली गेली. तर असे न होता आपले वृक्षप्राधिकरणावर माझा आरोप आहे की ज्या वेळेस निसर्गाच संतुलन बिघडलेल आहे झाडतर वाढलेली आहेत आणि आपण वृक्षारोपण दरवर्षी लाखोच्या पटीने करतो असे असताना काही विकसकाना आपण काही नियम व अटि घालून दिलेल्या आहेत तरी या नियम व अटि घालून देताना याच्यावर हेड कोणाचं आहे का ? ज्यावेळेला आपल्या वृक्षप्राधिकरणाची व्हिजीट येते त्यावेळेस हे कुंडीतली झाड त्याठिकाणी आणून ठेवली जातात. व्हिजीट निघून गेल्यानंतर ती झाडे काढली जातात. ती झाडे लावली का, जागेवर आहेत का हे बघितले जात नाही. पुर्णत्वाचा दाखला देताना सुध्दा बघितले जात नाही. याठिकाणी यादी दिलेली आहे त्यात नाव सुध्दा मी सांगेल की कोणत्या कोणत्या बिल्डींगला झाडे नाहीत. पर्यावरणाचा -हास होत असताना, या बिल्डर्सना आपण एनओसी देताना काही आर्थिक उलाढाल करुन दिलेली आहे का ? १०० टक्के आर्थिक उलाढाल करुन एनओसी दिलेली आहे असा माझा आरोप आहे. त्याठिकाणी १०० चौ.मी.ला एक झाड असं असताना व तिथं झाडेच जागेवर नसताना हे कसे दिले आहे. हे परमिशन देण्याच्या पाठीमागचे कारण काय ? याच्यामध्ये कोणाचा हात आहे. याच्यावर आपली कुठली समिती नाही का ? एखादी बिल्डींग बांधायला घेतली आहे व तेथे १० झाडे लावण्याचे बंधनकारक असताना ती झाडे लागलीत का नाही हे बघितले जात नाही. पुढे असे उत्तर दिलेले आहे की, बांधकाम चालू करताना १०० चौ.मी.ला एक वृक्ष आवश्यक आहे. वृक्ष नसतील तर एक वृक्षास वृक्ष प्राधिकरण ठराव क्र. ९ दिनांक ५/६/२०१० अन्वये र.रु. २०००/- प्रतिवृक्ष अनामत घेतली जाते. जरी त्यांनी झाड लावलतरी आम्हांला आहेर नाही आणि नाही लावलतरी आहेर नाही आम्ही २ हजार झाडाचे घेतो. ५५३८ बिल्डर्सने हे डिपॉझिट आपल्याकडे भरलेले आहे ते किती लोकांनी परत नेलेले आहे याचे उत्तर पाहिजे. हे सगळे उत्तर गोलगोल फिरुन दिलेले आहे. अनामत भरलेस ३ वर्षे पुर्ण झाल्यानंतर स्थळ पहाणी करुन लावलेल्या झाडांचा बुंधा २५ सेमी झाल्या नंतरच अनामत रक्कम परत केली जाते. ५५३८ विकसकाना आपण परमीशन दिलेले आहे त्याच्यामध्ये किती बिल्डींग पुर्ण झालेल्या आहेत आणि किती लोकांनी डिपॉझिट परत नेलं याचे उत्तर दयावे.

**मा.सुरेश साळूंके (मुख्य उदयान अधिक्षक)** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. महाराष्ट्र नागरी क्षेत्र झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ नुसार बांधकाम भूखंड क्षेत्रासाठी आपण दोन वेळा एनओसी देतो. एकदा बांधकाम चालू करण्याकरिता आणि बांधकाम पुर्णत्वाच्या वेळेस उदयान विभागाची एनओसी लागते. सन २००७ पासून ५५३८ वृक्षसंवर्धन नाहरकत दाखले दिलेले आहेत. यामध्ये पुर्णत्वाचे आणि बांधकाम चालू करण्याचे दाखले आहेत. बांधकाम चालू करण्याचे जे दाखले आहेत ते ४२६५ आहेत आणि पुर्णत्वासाठी दिलेले १२७३ आहेत. सुरवातीला डिपॉझिट घेतो, डिपॉझिट असं घेतो की तिथं १०० चौ.मी. ला

एक झाड नसेलतर आपण डिपॉझिट घेतो. आणि बांधकाम चालू करताना १०० चौ.मी.ला तिथे झाड नसेलतर एका वृक्षास २०००/- अनामत घेतली जाते. सुरवातीला १९९७ पासून ही सुरवात केलेली हाती. १९९७ मध्ये सुरवातीला आपण ५०० रु.डिपॉझिट ठेवले परत १ हजार केले परत १५०० केले व त्यानंतर २०१० पासून २ हजार केलेले आहे. त्यानुसार ४२६५ बांधकाम चालू करण्याच्या दाखल्यामध्ये आतापर्यंतचे डिपॉझिट २६ कोटी २७ लाख १८ हजार १९१ झालेले आहे. हे डिपॉझिट २००६-०७ पासून सप्टेंबर २०१४ पर्यंतची ही फिगर आहे. त्याच्या अगोदरची जी फिगर होती मे १९९७ ते २००६ पर्यंत आपल्याला मिळालेले डिपॉझिट ६ कोटी १४ लाख २४ रुपये आहे. याबाबत आपण पाहणी केली आहे, झाड आहेत का हे बघितल, प्रत्येकानी आपआपले डिपॉझिट माघारी घेवून जावे म्हणून पेपरलाही जाहीर प्रकटन दिलेले होते. ब-याचशा वेळा असे आढळून आले की बिल्डरने प्लॉट बांधल्यानंतर, सोसायटीला हास्तांतरण केल्यानंतर सोसायटीवाले परत डिपॉझिट मागत नाहीत. बहल साहेब महापौर असताना ही मोहिम राबवली होती. त्यानुसार त्यांनी सांगीतलेल होत की जर सोसायटी डिपॉझिट माघारी नेत नसतीलतर जप्त करा त्यानुसार आम्ही मे- १९९७ ते २००५-०६ पर्यंतचे ६ कोटी ७ लाख रुपये जप्त केलेले आहेत. सन २००६-०७ पासून आतापर्यंत २६ कोटी २७ लाख आहेत. याबाबतचा आपण वृक्षसंवर्धन समितीमध्ये विषय ठेवलेला आहे की यावर्षी सुध्दा जाहीर प्रकटन दयायचे आहे. २००६-२००७ पासून २०१४ पर्यंत पुर्णत्वाचे १२७३ दाखले दिलेले आहेत. आपण पुर्णत्वाच्या वेळेस एवढच बघतो की झाड आहेत का नाहीत एवढेच बघतो. झाड असेलतरच त्यांना आपण पुर्णत्वाचा दाखला देतो. झाडे नसतीलतर आपण कसल्याही परिस्थितीत पुर्णत्वाचा दाखला देत नाहीत. डिपॉझिट माघारी न्यायच असेलतर झाड लावल्यापासून ३ वर्षे पुर्ण झाल्यानंतर स्थळ पहाणी करुन लावलेल्या झाडांचा बुंधा २५ सेमी झाल्यानंतरच अनामत परत केली जाते. ती सुध्दा त्यांनी ओरीजनल पावती दिली पाहिजे, त्यानंतर आपली समक्ष स्थळपाहणी होते. त्यांनी झाड लावली नसतीलतर आपण आपल्या मार्फत झाड लावतो परंतु झाड त्याठिकाणी असतात. माघारी जे डिपॉझिट नेले ते ७५ प्रकरण आहेत त्यामध्ये २६ लाख माघारी नेले आहेत.

**मा.दत्तात्रय साने -** मा.महापौर साहेब, वृक्ष प्राधिकरण या समितीचा नियम सांगीतलेला आहे. झाड लावले पाहिजेत, नाही लावलेतर २ हजार अनामत घेतली जाते.

**मा.सुरेश साळूंके (मुख्य उदयान अधिक्षक)** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. झाडे त्यानी लावलीच पाहिजेत त्यासाठी आपण त्यांच्याकडून स्टॅम्पपेपरवर हमीपत्र लिहून घेतो. ते हमीपत्र नोटराईज करुन घेतो.

**मा.दत्तात्रय साने -** मा.महापौर साहेब, या ज्या १२७३ आपण फिगर दिलेल्या आहेत याठिकाणी आपण कधी जायच यासाठी आपण एक पथक नेमा. पैसे नेले नाहीत म्हणजे झाडे लावत नाहीत. त्याठिकाणी आपण झाडे लावतो. माझ्या निदर्शनास आलेल आहे की आपले लोक

ज्यावेळेस साईड व्हिजीटला जातात त्यावेळेस हे लोक मोठया कुंडीतली झाडे घेवून जातात.

**मा.सुरेश साळूंके (मुख्य उदयान अधिक्षक)** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. मे-१२ मध्ये १२७ प्रकरण तपासणी केलेले होते. त्यामध्ये आपल्याला २१०६ वृक्ष असलेले आढळले, आवश्यक वृक्षापेक्षा काही ठिकाणी जास्त आहेत. कमी जास्त असतीलतर ते आपण लावायला सांगतोत परंतु मी तपास लावायला सांगतो.

**मा.दत्तात्रय साने -** मा.महापौर साहेब, २००७ ते २०१४ पर्यंत २६ कोटी आपल्याकडे बॅलेन्स आहे. १९९७ ते २००६ ला आपला बॅलेन्स ६ कोटी होता. किती लोकांनी डिपॉझिट माघारी नेले.

**मा.सुरेश साळूंके (मुख्य उदयान अधिक्षक)** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. इन्डिज्यूअल लोक घेवून जातात परंतु मोठया सोसायटया असतीलतर बिल्डर्स त्यांच्याकडे पावती देत नाहीत त्यामुळे ते नेल्या जात नाही.

**मा.दत्तात्रय साने -** मा.महापौर साहेब, मग तुम्ही हे वृक्षारोपण का करता, दरवर्षी कितीतरी पटीने झाड लावता. हे बिल्डर्स लोक आपले जावाई नाहीत. या लोकांनी झाडे लावले का नाही ही जबाबदारी त्यांच्यावर आहे हे अधिनियमात सांगीतलेले आहे. जरी झाड लावण्याचे आपण कम्प्लशन केलेल असेलतरी १०० पैकी १० लोक असतीलतर ९० लोकांनी पैसे परत नेले पाहिजे. सगळया लोकांना मिसगाईड कोणी करत नाही. याचा अर्थ १२७३ बिल्डींगला झाडच नाहीत असा मी शंभर टक्के सभागृहात आरोप करतो.

**मा.सुरेश साळूंके (मुख्य उदयान अधिक्षक)** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. तुम्ही तुमच डिपॉझिट परत घेवून जावे म्हणून आपण पेपरमध्ये डिक्लेअर करतो.

**मा.दत्तात्रय साने -** मा.महापौर साहेब, ते डिपॉझिट परत नेत नसतीलतर तुम्ही त्या पैशाचे काय करतात. १२७३ लोकांचे पैसे जप्त करणार का. शॉर्ट उत्तर दिलेले आहे. माझा आरोप आहे की १२७३ लोक आहेत त्यांचे २६ कोटी आपल्याकडे शिल्लक आहे ते नेले नाहीत म्हणजे त्यांनी झाड लावलेले नाहीत. १०० चौ.मी.मध्ये एक झाड लावल पाहिजे असा नियम आहे. आज माझ्या निदर्शनास आलेले आहे, काही बिल्डर्सचे नाव न घेतलेलच बरंय.

**मा.महापौर** - पुढच्यावेळेस तुम्ही प्रश्न करु शकता, तो अधिकार तुम्हांला आहे.

**मा.दत्तात्रय साने -** मा.महापौर साहेब, या प्रश्नाच उत्तर पुढच्या वेळेस तुम्ही देणार आहेत का.

( मा.नगरसचिव यांनी सभा कामकाज नियमावलीतील नियम क्रं.१०५ चे वाचन केले. पुरक प्रश्न नवीन प्रश्न म्हणून आपल्याला पुढच्या सभेपुढे घेता येईल असे सांगितले )

**मा.दत्तात्रय साने -** मा.महापौर साहेब, जे मला अपेक्षीत आहे ते एक सुध्दा उत्तर नाही. विकसकाची यादी एवढेच उत्तर आहे. मला जे अपेक्षीत उत्तर आहे त्यातील एक सुध्दा उत्तर यामध्ये नाही.  काल हेच अधिकारी आमच्या कार्यकर्त्याला म्हणाले, म्हणजे अधिका-यांची कितपत मजल आहे हे लक्षात घ्या. की सभागृह बोंबललं, दोन दिवस पेपरला येईल आणि तीस-या दिवशी सर्व शांत होईल माझ कोणी काही करणार नाही, असं हे बोलले. हे सभागृह बोंबलण्यासाठी आहे असे अधिकारी सांगतात. असे साळूंके साहेब आमच्या एका कार्यकर्त्याला बोलले आहेत. अशी भाषा साळूंके साहेबांनी वापरलेली आहे. उदयानाचे प्रश्न विचारण्याचे कारण सांगतो, आज आपण एवढे मोठे झाड लावतो, बिल्डर्स लोकांनी हे कम्पलसरी करायला पाहिजे, त्यांनी झाडे लावलीत का नाहीत हे पाहिले पाहिजे. हे दिलेले उत्तर आहेत याला जबाबदार कोण ? असे असताना एवढया निर्दयीपणे उत्तर देत असतीलतर याच्यापेक्षा वाईट अजून काय. ही भाषा आहे या लोकांची, म्हणजे हे आपले जावाई आहेत का ?

**मा.योगेश बहल -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, अधिकारी वर्ग. वास्तविक पाहता दत्ता साने यांनी अतीशय चांगली माहिती मागीतलेली आहे. आपण लोकांना आवाहन करत असतो की, “पाणी वाचवा, पाणी जिरवा”, वृक्ष लावा, शहर हरित ठेवा, सुंदर ठेवा. परंतु आता साळूंके साहेबांनी माहिती दिली की मी महापौर असताना काही निर्णय घेतले होते. परंतु त्यांनी दिलेल्या माहितीवरुन आणि तक्त्यावरुन असे दिसून येते की चार हजारपेक्षा अधिक लोकांनी बांधकामाची परवानगी मागीतली. म्हणजे पहिली एनओसी त्यांनी घेतलेली दिसते. आणि दुसरी एनओसी घेताना १२७३ लोकांनीच दुस-या एनओसीला अप्लाय केलेला दिसतो आणि ७५ लोकांनीच फक्त पैसे परत नेले. त्यांनी सांगीतल की २००६ पर्यंत आपण ६ कोटी जप्त केले. आणि आता २६ कोटी रुपये पुन्हा त्याच मार्गाने आहेत हे आपल्यासाठी काही भूषणावह आहे असं आपल्याला वाटतयं का ? दत्ता साने यांच्या म्हणण्याचा रोष जरी असा असला की बिल्डर्स लोकांना आपण जावाई केलं का ? वास्तविक पाहता कायदयामध्येच पळवाट आपण अशी ठेवलेली आहे की त्यांनी एका गुंठयामध्ये ते झाड लावायच त्यात बांधनकारक आहे तोपर्यंत त्यांनी आपल्यालकडे २ हजार रुपये अनामत म्हणून ठेवायची असते. त्यांनी ३ वर्षापर्यंत ते झाड लावा आणि २५ से.मी.चा बुंदा व्हावा अन्यत: ते पैसे जप्त होतील. सगळेच बिल्डर्स अशाप्रकारचे पैसे आपल्या तिजोरीमध्ये जमा करतात आणि त्या कायदयातून ते पळतात. दुस-या बाजूला मी महापौर असताना आपण असाही निर्णय घेतला होता की आपण छोटी छोटी झाड घेतो ती छोटी झाड लावून आपण ट्रिगार्ड देतो, ते काही ठिकाणी जळून जातात, काही ठिकाणी मरुन जातात त्यापेक्षा मोठी झाड लावायची आणि तो निर्णय घेतल्यानंतर शहरात ब-याचशा ठिकाणी मोठमोठी झाड लागलेली आपल्याला दिसतात म्हणून शहर हरितपण दिसतं. परंतु हे होत असताना शहरामध्ये झपाटयाने जंगल होत चाललेल आहे, त्या अनुषंगाने बांधकाम होत चाललेले आहे. मग ते मॉल असतील, हॉस्पिटल असतील,

कॉलेजेस असतील, राहण्याचे निवासी संकूल असतील परंतु याच्यामध्ये झाडांची कटींग होते आणि हे होत असताना ज्यावेळेला आपण त्या बिल्डर्सकडनं त्या डेव्हलपर्सकडनं त्या विकासकाकडनं अशा पध्दतीची अनामत घेतो म्हणजे आपल्या जबाबदारीतून आपण मुक्त झालो असं काहीतरी प्रशासनाच एकंदरीत मत दिसतंय आणि अशाच प्रकारच उत्तर आपल्याला साळूंके साहेबांकडून आलेलं आहे. मला उलट सांगायच आहे की त्यांनी कायदयाच पालन केल ईथपर्यंत ठिक आहे परंतु दुसऱ्या बाजूला या पुर्ण शहराला हरित ठेवण्याची जबाबदारी उदयान विभागाकडे आहे त्यासाठी आपल्याकडे वृक्षसंवर्धन समिती आहे. परंतु या समितीमध्ये नेमक काम काय येततर या समितीकडे फक्त एकच काम येत की शहरातील झाडे छाटा, झाडे तोडा आणि झाडे काढा. ज्याठिकाणी अडचण आहे त्याठिकाणचे झाडे काढले गेले पाहिजे, ज्याठिकाणी अडचण आहे त्याठिकाणचे झाडे छाटले पण गेले पाहिजे परंतु पर्यायाने ते छाटण्याच्या आदि ते काढण्याच्या आदि आपण दुसऱ्या झाडाची लागवड करतो का ? तो बॅलेन्स आपण साधतोय का ? याच्याकडे मात्र कोणाचही लक्ष नाही ही दुर्दैवाची बाब आहे. त्यामुळे आपण एका बाजुला कोटयावधी रुपये तिजोरीमध्ये घ्यायचे आणि आपल्या शहराला बकाल करायचं हे जणुकाय धोरणच आपण अंगीकृत केलय असंच आपल्याला वाटतं. आणि म्हणून त्याठिकाणचे एन्जीयो असतील, तिथल मंडळ असतील, तिथल महिला मंडळ असेल, तीकडचे ज्येष्ठ नागरीक असतील यांच्यावर ही जबाबदारी सोपवावी आणि त्यांना काही मानधन स्वरुपाने किंवा त्या सोसायटीला आपण त्यांच्या बिलामध्ये काहीतरी सुट दयावी. आणि ती झाड जोपासून दाखवावी आणि तशाप्रकारचा दाखला वृक्ष संवर्धन समितीन त्यांना दिल्यानंतर आपण जी आपल्याकडे अनामत रक्कम २ हजारच्या रुपाने आलेली आहे त्यातले काही पैसे त्या सोसायटीला, त्या महिला मंडळाला, किंवा त्या बचत गटाला, त्या एन्जीयोला आपण देवू केले पाहिजेत जेणेकरुन झाड आपण दयायच. कारण २ हजार रुपये घेतातच ते, झाड आपण विकत आणायच, झाड आपण त्यांना दयायच आणि झाड दिल्यानंतर तिथल्या संस्थेवर ती जबाबदारी दयायची आणि त्या संस्थेनी आपल्याला त्याप्रकारचा बुंदा करुन दिल्यानंतर त्यातले काही पैसे त्यांना दयायचे असे झाले तरच ख-या अर्थाने याचा समतोल साधला जाणार आहे तरच ख-या अर्थाने झाडाची लागवड होणार आहे, तरच ख-या अर्थाने हे शहर हरित ग्रीन कसे राहील याची दक्षता आपण घ्यावी. दत्ता साने यांच्या म्हणण्याच तात्पर्य तेच आहे ते म्हणतानं आरोप करीत असतील परंतु त्यांच्या म्हणण्याचा रोष तुम्ही बघा काय आहे तो की शहरातील झाड संपत चाललेली आहेत फक्त डिपॉझिट जप्त केली म्हणजे आपलं समाधान झाल का, आपल काम ते नाही. थोडक्यात पैसे घेवून झाड लावूच नका अशाप्रकारची मुक परवानगी आपण दिल्यासारखं आहे. तरी ही मुक परवानगी देता कामा नये. ठिक आहे, त्या काळामध्ये तुम्ही त्यांना रोखू शकत नाहीत किंवा त्या नियमामुळे त्यांनी तुमच्याकडे डिपॉझिट ठेवले ते मागायला येत नाहीत. परंतु आपली जबाबदारी संपली का ? आपली जबाबदारी संपत नाही.

त्यासाठी तुमचाही स्कॉड असला पाहिजे, तुमची यंत्रणा त्याच्यावर असली पाहिजे आणि वृक्षसंवर्धन समितीला मिनीटसचा पण अधिकार दयावा, झाड लावण्यासाठी पण आपण त्यांना अनुमती दिली पाहिजे. फक्त झाड तोडण्याच्या परवानगीसाठी ही वृक्षसंवर्धन समिती आहे ही दुर्दैवाची बाब आहे. अशा पध्दतीने जर आपण या सगळया गोष्टीचा समतोल राखलातरच ख-या अर्थाने आपल्याला हे शहर चांगल, हरित ठेवता येईल त्याच संवर्धन साधता येईल, धन्यवाद.

**मा.दत्तात्रय साने -** मा.महापौर साहेब, प्रश्न असा आहे की, २००७ पासून झाडे लावली त्यातली जगले किती आणि मेली किती ? आपल्या मनपाच्या उदयानामध्ये रोपे तयार करतो का ? करतो तर किती कोणकोणती झाडे तयार करतात त्यांची नावासह यादी देण्यात यावी. याची यादी दिलेली आहे. २००७-०८ ते २०१३-२०१४ या कालावधीमध्ये विभागाने ३,२२,१९८ झाडांची लागवड केली त्यामध्ये ८० टक्के वृक्ष जिवंत आहे. असे उत्तर दिलेले आहे. जे वृक्ष लावलेली आहेत ती जवळपास ८० टक्के जगली असा यांचा दावा आहे. मी आपल्या निदर्शनास एक गोष्ट आणून देतो की, दुर्गादेवी टेकडी मध्ये रेबण्ड पॉईंट केलेला होता त्यामध्ये जूने सगळे झाडे तोडून, त्याच सगळ सपाटीकरण करुन त्याठिकाणी दोन-तीन वर्षापुर्वी लाखोमध्ये झाडे लावली आहेत. यांच्या म्हणण्याप्रमाणे ती लावलेली झाडे ८० टक्के जगली आहेत. पाच लाख झाडे त्यावेळेला लावलेली आहेत त्यामध्ये आज जेवढे झाडे लावली त्यातील एकही झाड त्याठिकाणी नाही. माझा रोष पर्सनल एका व्यक्तिशी नाही. वृक्ष प्राधिकरणावर एवढी रक्कम खर्च करतो, प्रत्येक नगरसेवक झाडे लावण्याचा प्रयत्न करतो. आपल्या भागातील निसर्गाचा समतोल राहीला पाहिजे, आपल्या भागामध्ये निसर्ग सौंदर्य चांगले राहिले पाहिजे या उद्देशाने आपल्या येथे प्रत्येक नगरसेवक झाडे लावतो. कमीत कमी दहा झाडे लावली आणि त्यातील दोन जगली आहेत व आठ झाडे मेली आहेत याला कारण ज्यावेळेस आपण ती झाड लावतो त्यावेळेस कुठलाही कर्मचारी त्या झाडाला पाणी घालत नाही. ती झाडे लावून त्याला ट्रिगार्ड असतात ते कधीही लावले जात नाहीत. आणि लावलीतर दुस-या तीस-या दिवशी ती जाळी उपसून त्याच कॉन्ट्रॅक्टरच कोणीतरी उचलून घेवून जात आणि तीच जाळी परत दुस-या ठिकाणी येते. एकच जाळी दहा झाडाना वापरली जाते असा हा प्रकार आहे. जर त्या रेंबण्ड पॉईंटला एवढी झाड लावली असतीलतर हे तीन लाख झाड लावलेली आहेत त्यामध्ये ८० टक्के झाड जगली असे उत्तर दिलेले आहे हे सगळे चुकीचे उत्तर आहे. ८० टक्के झाड म्हणलेतरी २ लाख ७५ हजार झाड जागेवर पाहिजेत. एक सुध्दा झाड जागेवर नाही. जुन ते जुलै दरम्यान वृक्ष लागवड कालावधी असतो तो फक्त धंदा करण्यासाठी वृक्ष लागवड केली जाते निसर्गाचा समतोल राहण्यासाठी वृक्षारोपण केले जात नाही असा आरोप आहे. आपल्या रोपवाटीकेमध्ये जी रोप लावली त्याची यादी दिलेली आहे. पिंपळ या झाडाचे रोप कसे तयार केले जाते हे मला अजूनपर्यंत तरी आठवल नाही. से.क्र.२७ गुलाबपुष्प उदयान येथे पिंपळ ६ तयार केले असे

दिलेले आहे आणि फणस १२६० तयार केलेले आहेत. माझा पुढचा प्रश्न असा आहे की, रोपवाटीकेमध्ये खाजगी रोपे वाटली जातात का ? त्यामध्ये खाजगी झाडे विकली जात असेलतर मनपा त्याचा मोबदला घेते का ? याचे उत्तर नाही म्हणून दिलेले आहे. जर रोपवाटीका आपल्याकडे विकली जात नसतीलतर से.नं. २७ ला जी नर्सरी आहे तेथील मोबदला कोण घेतं. माझ्या चिखलीमध्ये नर्सरी आहे त्याठिकाणी सर्रास रोप विकली जातात याची आपण नोंद घ्यावी. बिल्डर्सला किंवा ज्याला लागणार अशा लोकांना ती रोप विक्री केलेले आहेत. उदयान विभागाने तयार केलेले रोप २००६-२००७ ला ३९५४४ रोप तयार केले, २००७-०८ ला ३९६९६ रोप तयार केले, २००८-०९ ला ५७९१४ रोप तयार केले, २००९-१० ला ४५०५३ रोप तयार केले, २०१०-११ ला ४३८०० रोप तयार केले, २०११-१२ ला ४१२९९ रोप तयार केले, २०१२-१३ ला ४०७८९ रोप तयार केले, २०१३-१४ ला ३०४६० रोप तयार केले. म्हणजे २००६-०७ ला ३९५४४ रोप तयार होत असतीलतर, दरवर्षी हे रोप तयार करण्याचे काम सोडून २०१३-१४ ला ही संख्या ३०४६० वर आली हे कमी झाले याला जबाबदार कोण आहे ? आपल्याला झाडे लावायची असतीलतर हे रोप वाढले पाहिजेत का कमी झाले पाहिजेत. २००७ ची लोकसंख्या आणि २०१४ ची लोकसंख्या किंवा २००७ ची जनगणना किंवा त्यावेळचे विकसक आणि आताची जनगणना किंवा विकसक यामध्ये फरक आहे. मग २०१४ ला जास्त रोप तयार झाले पाहिजेत का कमी झाले पाहिजेत. यांच्या निष्काळजीपणामुळे या सगळया नर्सरीमध्ये हे झाड ३० हजारावर आलेली आहेत. वृक्षारोपणावेळेस ही झाड विकत आणतो. आपल्या स्वत:च्या नर्स-या आहेत आपण स्वत: ही झाड विकसीत करु शकतो मग हे झाड विकत आणण्याचे कारण काय ? जर आपली नर्सरी आहे, आपण झाड तयार करु शकतोतर मग आपण ही झाडे विकत का आणतो. जी झाडे आपल्याला लागणार आहेत ती सगळयात कमी आहेत. आपल्या येथे जी झाडे लावली जातात ती झाड सगळयात कमी आहेत. त्यामध्ये अशोकाचे झाड आपण २००६-०७ ला २०० तयार केलेली आहेत. वड तयार करणे हे मला समजलेले नाही. फायकसची झाड पिंपरी चिंचवडमध्ये ब-याच ठिकाणी चांगली आहेत म्हणून लावली जातात. ही झाडे आपल्याकडे उत्पादन केली जातात आणि कमी पडले की बाहेरुन खरेदी केली जातात व हा खरेदीचा ठेका सुध्दा आपल्याच विभागातील काही लोकांचा आहे. नर्सरीतून झाडे आणायची आणि महापालिकेला पुरवायची असा ठेका आपल्या लोकांचा आहे. २००७ ला झाड ३९ हजार तयार केले जातात तर आता कमी कसे काय ? ही सर्व झाडे २००७ ला लावली हे जागेवर आहेत का ? २०१४ ला ३०४६० झाडे दाखवली. २००६-०७ ला ६१ जातीचे झाडे होती, २००७-०८ ला १७ वर आणले, २००८-०९ ला ३४ वर आणले, २००९-१० ला २९ वर आले, २०१०-११ ला २३ जातीचे झाड होती व २०१३-१४ ला १९ जातीचे झाड ठेवली आहेत. २००६-०७ ला ६१ जातीचे झाड तयार करत असू तर २०१३-१४ ला ही बाकीचे झाड कुठे गेली. याचा अर्थ २००७ ला जी झाड गरजेची होती ती २०१४ ला त्याची गरज नाही असे म्हणायचे का ? आणि २००७ ला

३९५४४ झाडे होती व २०१३-१४ ला ३०४६० झाड म्हणजे १० हजाराची तफावत असेलतर नक्कीच उदयान विभागामध्ये काळबेरं चाललेल आहे. दरवर्षी किती झाड आपण खरेदी करतो, किती लाखाची झाड आपण आणतो, याच सुध्दा उत्तर मागीतलेल असताना याच्यामध्ये दिलेल नाही. या झाडामध्ये सिताफळ तयार केलेले आहे. २०१२-१३ ला १ हजार सिताफळ तयार केले, ही झाड कुठे लावली आहेत, कोणाच्या बागेत दिली किंवा कोणत्या शेतक-याला दिलेली आहेत. सिताफळाची झाड आपण लावतो का, आपण फळबाग लावतो का ? फळबाग लावत असूतर मग आंबा का लावला नाही. सिताफळ आपल्याकडे तयार केले जातात तर ते कुठे लावले याचे उत्तर दयावे. गुलाबपुष्प उदयानामध्ये झाडे कुठे तयार करतो. सेक्टर नं. २७ ला आम्ही गुलाबपुष्प उदयान नाव दिले. त्याठिकाणी गुलाबाची ५० झाड तयार करतो व त्याला नाव दिले गुलाबपुष्प उदयान. ज्याची गरज आहे ते झाड अडळुसा हे वनस्पती औषध आहे ते आपल्या उदयानामध्ये ४५ झाड तयार झालेले आहेत. वड याचे उत्पन्न झाले ११४६, नंतर जड हे झाड काय प्रकार आहे हे मला समजला नाही, जड हे झाड ५० तयार केलेले आहेत. फायकस या झाडाची गरज आहे. अशोकाचे २०० झाड तयार केलले आहेत. अनेक ठिकाणी, अनेक वॉर्डामध्ये आपण हे लावलेले आहेत ते विकत आणले. हे आपल्याकडे फक्त २०० तयार होतात. ज्या झाडांचे वृक्षारोपण करतो ती झाड आपल्याकडे का तयार होत नाहीत. जी झाड वृक्षारोपणला लागत नाहीत अशी झाड आपल्या वृक्षारोपणमध्ये तयार केली जातात. या नर्स-या आपल्याला टिकवायच्या असतीलतर यामध्ये झाडे तयार करायला नको का **?** उदयान विभागामध्ये आपण लक्ष घालण्याची गरज आहे. कारण हा विभाग आपल्या अखत्यारीत चालतो महापालिकेशी संलग्न नसावा. २०१४ ला सूरुची ५० झाडे तयार केलेली आहेत. कांचनचे १५०० झाड तयार केलेली आहेत, शंकेश्वरची २०२ झाडे तयार केलेली आहेत, भेंडीची १०० झाडे तयार केलेली आहेत, पिंपळची ६ झाडे तयार केलेली आहेत. काही ठिकाणी वड, पिंपळ लावले. निसर्गाचा समतोल ठेवायचा असेलतर निम, वड, पिंपळ, चिंच ही झाडे अपेक्षीत आहेत ही झाड मोठीपण होतात. त्याच्यामुळे निसर्गाचा समतोल होतो. यामध्ये हे झाड एकही दिसत नाहीत. याच्यामध्ये वड दिसत नाही, पिंपळ दिसत नाही, चिंच दिसत नाही. बदामाची झाड ३०० लावलेली आहेत. ही झाड लावतो परत ती वर्षा दोन वर्षामध्ये तोडून टाकतो. कारण त्याचा कचरा जो आहे तो जास्त होतो त्याच्यामुळे नागरीक सांगतात की बदामाची झाड तोडा. जी झाड चालत नाहीत ती झाड जास्त व जी आपल्याकडे चालतात ती झाड कमी आहेत. असा प्रकार या उदयानामध्ये चाललेला आहे तरी उदयान विभागामध्ये आपण लक्ष घालाव अशी विनंती करतो. थरमॅक्स चौक ते केएसबी चौक त्याठिकाणी गेल्या पाच वर्षे बघतो त्या रस्त्यामध्ये पहिले लावले सुपारी झाड ते मेलं त्यानंतर अशोकाच झाड लावल ते सुध्दा मेलं, आता फायकस आणि बदाम आहे ती सुध्दा काही जगली काही मेलेली आहेत. असे होत असताना अनेक वेळेस मी उदयान अधिक्षकांच्या कानावर घातलेले होते. थरमॅक्स चौक ते

केएसबी चौक या त्याठिकाणी हरळी वरती झाड चांगले लागलेले आहेत. त्याप्रकारचा या रोडला करण्याचा आपण प्रयत्न केला आहे परंतु त्याठिकाणी ही झाडे आपण पुनर्रोपीत करत असालतर एका झाडाचा खर्च कमीत कमी दोन ते तीन हजार पाच हजार असेल. मग एखादे झाड उचलून दुसरीकडे लावतो हे पाच हजार आपण त्या ठेकेदाराच्या माध्यमातून देतो का. हे झाड कधीही जगलेले नाही. थरमॅक्स चौक ते केएसबी चौकामध्ये पुनर्रोपीत झाडे केलेली आहेत. एकही झाड जगलेल नाही याला जबाबदार कोण ? चिखली गायरानामध्ये दोन चार ठिकाणी पुनर्रोपीत झाडे केलेले आहे. एका बाजुने १४ आणि दुस-या बाजुने १४ झाडे पुनर्रोपीत केलेले आहे. त्याठिकाणी सध्या आपले अधिकृत कर्मचारी आहेत, गायकवाड व माळी हे आहेत. १४-१४ झाड दोन्ही बाजूने लावलेले आहेत त्यातली फक्त तीन झाडे जीवंत आहेत. सहा महिन्यामध्ये ही झाड मरत असतीलतर तुम्ही ठामपणे सांगता ३ लाख ३२ हजार १९८ वृक्षापैकी ८० टक्के जगले आहेत. ही टक्केवारी कशी काढली हे सांगावे. १४ झाडापैकी ४ झाडे जगत असतील आणि बाकीचे सगळे मेली असतीलतर ८० टक्के झाडे आली कुठून, यांनी ८० टक्के एवढ ठामपणे उत्तर दिल कसं ? या सर्व गोष्टीचा आपण विचार करावा. आणि ऋषीकेश पुजारी हा मयत झालेला मुलगा आहे त्याची जबाबदारी कोणावर तरी दयावी, महापौर साहेब, आपण तसे आदेश दयावेत. तसेच त्याच्या मयतीच्या पाठिमागची कारणे शोधावीत अशी विनंती करतो. यामध्ये जे गार्डन आपल्याकडे आता अव्हेलेबल आहे त्यामध्ये पुर्वी स्पिकर सिस्टीम होती. सकाळी सकाळी संगीत, गाणे लागायचे ते संभाळण्यासाठी सुरक्षारक्षक नाहीत त्यामुळे ते चोरीला गेलेले आहे. त्याठिकाणी स्पिकर सिस्टीम नाही, त्याच्यावर लाईट नाही, त्याच्यावर ट्रीगार्ड नाही, तिथं सुरक्षारक्षक नाहीत. फक्त ३४ गार्डनला सुरक्षा रक्षक आहेत बाकीच्या गार्डनला सुरक्षारक्षक नाहीत. त्याठिकाणचे कंपौंड, ग्रील, गेट हे सगळे चोरुन नेलेलं आहे. गार्डनचा चालू बंदचा टाईम कधीही आपल्याकडे नाही. हे गार्डन आहेत त्याच्यावर कोणाचही चालू बंद करण्याच नियंत्रण नाही. गार्डनमधली लाईटचा सकाळचा व संध्याकाळचा टाईमींग सुध्दा नाही. हे सगळे असताना तेथे ज्यावेळेला हे मटेरीअल चोरीला जाते त्यावेळेला आपल्याकडे असा एखादा नियम केला पाहिजे की महापालिकेची एखादी वस्तू जर कुठ भंगारामध्ये विक्री केली जात असेलतर त्यांच्यावर अधिका-यांनी गुन्हा दाखल केलेला आहे का ते सुध्दा झालेले असेलतर सांगावे. मला वाटत हे सुध्दा केलेल नाही कारण चो-या करणारे, ज्यांच्याकडून आपण हे घेतो तेच हया चो-या करतात असा माझा आरोप आहे. महिला/पुरुषांसाठी अनेक उदयानामध्ये टॉयलेट ब्लॉक नाहीत. ज्यावेळेस आपल्या भगिनी असतील, बांधव असतील त्यांच्या टॉयलेटच्या बाबतीत सुध्दा व्यवस्था नाही. आयुक्त साहेब, हे सगळ आपल्यासाठी सांगतो. हे करत असताना आपण या सगळया गोष्टीवर लक्ष घालावं. आणि ज्यावेळेस हे सगळे विषय होणार आहेत या सगळया ज्या काही उणिवा आहेत त्या

सगळया काढाव्यात अशी विनंती करतो. साळूंके जे शब्द बोलले आहेत ते कशासाठी बोलले हे सांगावे अशी विनंती करतो.

**मा.स्वाती साने -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. वृक्षवाटीकेमध्ये जो मुलगा मृत्युमुखी पडलेला आहे खरंतर ते आता काकांनी सांगीतलेच आहे. ज्यावेळेला ही घटना घडली त्यावेळेला रात्रीचे दहा ते आकरा वाजले असतील. मी आयुक्तांना फोन केला अशी अशी घटना झाली आहे काय करायचे. त्यावेळेला मी नागरीकांमध्ये होते त्यावेळेला आयुक्त साहेबांनी सांगीतलं होत की झालेली घटना ही भरुन काढू शकत नाहीत परंतु आपण त्यांना आर्थिक मदत करु, असा आयुक्त साहेबांनी शब्द दिलेला होता. ही घटना घडली त्यावेळेस जी ठेकेदार आहे ती वायसीएममध्ये आली परंतु त्याठिकाणी पीसीएमसीचा एक सुध्दा अधिकारी आलेला नाही आणि दुस-या दिवशी सकाळीही नाही. ती ठेकेदार ही लेडीज होती ती रात्री २ वाजेपर्यंत वायसीएममध्ये होती. पुन्हा सकाळीपण येवून जी काही मदत करायची जो काही मानसीक आधार होता तो सुध्दा या लेडीजने दिला. आपल्या पीसीएमसीच्या अधिका-यांनी दिलेला नाही. हे ठेकेदारानीच करायचे का ? पीसीएमसीची काही जबाबदारी नाही का ? कुठले अधिकारी त्याठिकाणी आले हे सांगावे. त्यावेळेस अशी परिस्थिती होती की जवळ जवळ तीस ते चाळीस ग्रामस्थ वायसीएममध्ये होते व एकटी लेडीज ग्रामस्थांच्या संतापाला सामोरे जात होती. हे सगळ प्रकरण झाल, त्यादिवशी आयुक्त साहेब नव्हते. दुस-या दिवशी अतिरीक्त आयुक्त, शिंदे साहेब यांच्या कानावर मी हे घातलं, त्यांनीही सांगीतल साळूंके साहेब येतील, तरी साळूंके साहेब आले नाहीत. गावडे साहेबांना सांगीतले त्यावेळेस त्यांनी सांगीतले साळूंके साहेब येतील, फोन करतील ते सुट्टीवर होते असे म्हणतात परंतु कुठल्याही पीसीएमसीचे अधिकारी आलेले नाहीत. हे प्रकरण झाले त्याला जबाबदार कोण ? ठेकेदार का अधिकारी. अधिकारीच जबाबदार आहेत. पी.के.भोसले हा त्यांनीच ठेवलेला माणूस आहे हा त्यांचे प्रायव्हेट काम करतो. हा वायसीएमला आलेला नाही हा तिथं त्या मुलाच्या मयतीला गावाला गेलेला होता. का गेला कारण त्यांचे पर्सनल काम हा त्यांच्याकडून करुन घेतो. तेथे महापालिकेच्या खोल्या आहेत, सांगायची लाज वाटते असे त्याठिकाणी हा गैरप्रकार तिथे करतो. सभागृहाच्या वतीने माझी मागणी आहे की अगोदर त्याची चौकशी झाली पाहिजे. पी.के.भोसले याची चौकशी झाली पाहिजे. हा प्रकार का घडतो, कशामुळे घडतो. अधिका-यांना कुठलीही भीती राहीलेली नाही त्यामुळे असे गैरप्रकार घडतात. आर्थिक मदत करु म्हणून आयुक्त साहेबांनी शब्द दिलेला होता, त्याचा सुध्दा खुलासा करावा की पीसीएमसी कुठली मदत करणार आहे, झालेले आपण भरुन काढू शकत नाहीत. ज्यावेळेला ही घटना घडली, त्यावेळेस त्या मुलाच्या वडीलाला डेंग्यू झालेला होता. त्यांना सलाईन लावलेल होत. त्यांची वाईट परिस्थिती होती. मयत गावाला नेण्यासाठी सुध्दा त्यांची परिस्थिती नव्हती. ग्रामस्थानी वर्गणी करुन मयत गावाला नेली.

आयुक्त साहेब आपण सांगावे की पीसीएमसी आर्थिक मदत करणार का ? आयुक्तांनी ग्रामस्थांच्या समोर शब्द दिलेला होता, त्या ग्रामस्थांना मला तोंड दयाव लागतं.

**मा.आर.एस.कुमार -** मा.महापौर साहेब, या विषयावर बोलताना सुरक्षा बद्दल बोंबाबोब आहे. मनपाचे १७१ उदयान आहेत त्यापैकी २३ उदयानामध्ये सुरक्षा रक्षक आहेत बाकीच्या उदयानामध्ये नाहीत. कॉन्ट्रॅक्टरचे सुरक्षारक्षक असे म्हणलेले आहे, कोणताही ठेकेदार सुरक्षारक्षक नेमत नाही. तो माळीला राहण्यासाठी देतो. तो माळी सुरक्षारक्षकाची जबाबदारी घेवू शकत नाही. ते दुसऱ्या ठिकाणी कामाला जाणार मग गार्डन मधली सुरक्षाची जबाबदारी कशी घेणार. ठेकेदाराला तुम्ही जबाबदारी दिली तो ठेकेदार ४० ते ५० टक्के कमी रेटमध्ये कॉन्ट्रॅक्ट घेतो. त्यानंतर १० टक्के वाटप होते त्यानंतर बील देताना बरोबर काम केल नाही म्हणून ५ ते १० टक्के कमी देता. मग ४० टक्के इस्टीमेट रेटमध्ये तो व्यवस्थीत काम करु शकतो का आणि म्हणून ते काय करतात माळीला राहण्यासाठी देतात. तो आठ ते दहा तास दुसऱ्या उदयानामध्ये काम करतो. म्हणजे असे की तेथील उदयानाची जबाबदारी ठेकेदार घेत नाही. माझी आपल्याला विनंती आहे की, प्रत्येक उदयानामध्ये निवासी आपला सुरक्षा रक्षक पाहिजे त्यादृष्टीने विचार करावा. दुर्गादेवी टेकडीवर एक किंवा दोन वॉचमेन आहेत. पुर्ण एवढया मोठया गार्डनमध्ये वॉचमेन नाहीत. तेथे किती अवैध धंदे चालतात हे तुम्हांला माहिती आहे का. हे सुपरव्हिजन आहे तुमचं. आता येथे महिला असल्यामुळे मी सांगू शकत नाही तिथे कसे अवैध धंदे चालतात ते. मोठया गार्डनमध्ये एक किंवा दोन वॉचमेन मॅनेज करु शकत नाहीत. सकाळी ११ वाजले पासून ५ वाजलेपर्यंत बघावे. अशा ठिकाणी सुरक्षारक्षक वाढविले पाहिजेत त्यादृष्टीने विचार करावा. गार्डनमध्ये अनेक ठिकाणी काम बरोबर नाही. लॉन बद्दल मी पुर्वी सांगीतलेले होते. लॉन बरोबर मेन्टेन केले जात नाहीत. कुठल्याही गार्डनमध्ये जावुन बघा. दोन चार गार्डनमध्ये लॉन मेन्टेन केलं बाकीच्या गार्डनमध्ये झालेल नाही. लॉन कमी करायला पाहिजे असे सांगीतले, मला वाटतं ते उत्तर नाही. फुलांचे झाडे आहेत परंतु फुल कधीही दिसत नाहीत. कर्नाटकमध्ये बघुन या तेथे गार्डनमध्ये वेगवेगळे फ्लॉवर असतात त्यादृष्टीने येथे करावे. माझी विनंती आहे की लॉन बद्दल काहीतरी करावे. तळवडे पॉली हाऊसमध्ये फुलाचे उत्पादन ठेकेदार करतात आपल्याकडे अधिकारी, कर्मचारी आहेत ठेकेदाराला कशाला देता. ठेकेदारामार्फत कामगार कायदयाचे पालन होते का ? होय, कामगार कायदयाचे पालन केले जाते असे उत्तर दिलेले आहे. कसं कामगार कायदयाच पालन केल जाणार एकीकडे ५० टक्के बिलोमध्ये काम घेवून कामगाराला बरोबर पगार हे लोक देतच नाहीत. ४० टक्के कमी रेटमध्ये कॉन्ट्रॅक्ट दिलेले आहे याचाच अर्थ तो ठेकेदार कामगार कायदा पाळत नाही म्हणून हे उत्तर चुकीचे आहे

**मा.पौर्णिमा सोनवणे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा सभागृह. प्र.क्र.१ मध्ये प्रबोधनकार ठाकरे शाळा आहे त्याठिकाणी बेकायदेशिररीत्या वॉचमेन राहतो. तो महापालिकेचे

पाणी, लाईट वापरतो तो तेथेच राहतो त्याच्यावर काहीच कारवाई होत नाही. असे असेलतर त्याच्यावर कारवाई करणार आहात काय ? अशी परमीशन कुठल्याच मनपाच्या शाळेत नाही. त्याच्यावर कारवाई करण्याचे योग्य ते निर्देश दयावेत, ही विनंती धन्यवाद.

**मा.मंगलाताई कदम -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त व माझे सर्व सहकारी माझे सहकारी दत्तात्रय साने यांनी जे प्रश्न विचारलेले आहेत खरोखरच हे सर्व प्रश्न विचार करणारे आणि योग्य आहेत. पिंपरी चिंचवड शहरामध्ये एवढे उदयान आहेत, जसं आर.एस.कुमार यांनी सिक्युरीटीच्या प्रश्ना विषयी सांगीतले. प्रत्येक उदयानामध्ये आपल्याला किती सिक्यूरीटी नेमावे लागतील. म्हणजे एक उदयान एक सिक्युरीटी असं सांगणार नाही. त्याच्या प्रमाणावर किती सिक्यूरीटी नेमावे लागतील, मला वाटते बरेचसे बजेट त्याठिकाणी खर्ची पडले. सात-सात, दहा-दहा, वीस-वीस एक्करचे सुध्दा उदयान आपल्याकडे पिंपरी चिंचवड शहरामध्ये आहेत. जो काही सावळा गोंधळ चाललेला आहे पुर्वी त्या ठेकेदारांनी चालवायला घेतलेले गार्डन असतील मग तेच पुढे त्याच पध्दतीने चालविले जाते. याच्यामध्ये खरंतर आयुक्त साहेब तुम्ही लक्ष घातले पाहिजे. याच कारण असं आहे की उदयान किती एक्करचे आहे सात-आठ एक्करचे असे उदयान असतीलतर त्याला कमीत कमी दोन्ही साईडला सिक्युरीटी पाहिजे. तळे असतील तिथे तिन्ही साईडला सिक्यूरीटी असली पाहिजे. बर्डव्हॅली हे आख्ख गोल आहे त्याठिकाणी तुम्ही किती सिक्यूरीटी ठेवली. तो ठेकेदार एवढे माणस सांभाळू शकतो का ? तिथे घडणा-या गोष्टी, परंतु ज्यावेळेला एखादया ठेकेदाराला कॉन्ट्रॅक्ट पध्दतीने उदयान चालवायला दिलेले असेलतर पुढच्या वेळेस त्या ठेकेदारी पध्दतीमध्ये एखादा कॉलम वाढवा की पुर्ण जबाबदारी तिथे असणा-या माणसाची असेल. उदाहरणार्थ जर बर्डव्हॅलीमध्ये एखादी दुर्घटना घडली अपघात घडला आणि जर आपल्याला ते संभाळायची वेळ आली. अशी घटना घडू नये परंतू अशी कुठं संभाळावी लागलीतर आज कार्पोरेशनच्या दृष्टिकोनातून एवढं सोपं नाही. म्हणून आपण ज्यांना उदयान चालवायला देणार होतो त्याच्यामध्ये काही कॉलम वाढवावेत. याच्यामध्ये किती लोक कामाला असतील, तेथे राहणारे लोक कोण असतील, त्यांची जबाबदारी जो संबंधीत ठेकेदार आहे त्यानी घ्यावी असे करावे. जी घटना घडली ती खुप वाईट आहे, लहान मुलांच्या बाबतीत घडलेली घटना आहे. आपल्याकडे सब कॉन्ट्रॅक्टर दयायची पध्दत आहे. याच्यामध्ये ते कॉन्ट्रॅक्ट चालविणारी महिला आहे ती सर्वसामान्य बचतगट चालविणारी महिला आहे. अक्षरश: वाईट वाटतयं की जी बचत गट चालविणारी महिला आहे त्या बाईने १० टक्क्यानी दुसरीकडून पैसे काढले ४५ हजार दिले नंतर काही लोक येवून त्यांनी ६५ हजार घेवून गेले. बचतगटाच्या माध्यमातून उदयानाचा ठेका घेतलेल्या त्या महिलेला एक लाख भुर्दंड पडलेला आहे. म्हणून त्या ठेकेदारानी ठरवूदेत पुढची जबाबदारी घ्यायची का नाही ते. उदया जर तेथे कोणी राहीलातर त्याठिकाणी साप खुप निघतात. उदया सापाने जर दंश केलातर अशी घटना सुध्दा घडू शकते. त्यामुळे हा एक कॉलम तेथे वाढवावा. एखादया बचत गटातील महिलेनी गार्डन चालवायला घेतले त्यांच्याकडे पैस नव्हते,

अक्षरश: सर्वानी तीच्या मैत्रीणीनी वर्गणी काढून त्यामध्ये आपले काही सभासद सुध्दा आहेत की त्यांनी मागीतल्यानंतर त्या महिलेला पैसे दिलेले आहेत, अशा पध्दतीने त्या महिलेला ते पैसे दयावे लागले. शेवटी त्या महिलेनी जरी कॉन्ट्रॅक्ट घेतलेल असेल, शेवटी त्या महिलेनेही पगार घेतलेला आहे. तीचही तितकच कर्तव्य होत आणि त्याच बरोबर उदयान विभागाचे सुध्दा तेवढेच मोठ कर्तव्य आहे की आपल्या टाक्या तेथे असतीलतर त्या टाकीला झाकण लागले पाहिजे. ट्रिटमेंट प्लॅन्टमध्ये सुध्दा फार मोठया प्रमाणावर टाक्या आहेत त्याठिकाणी सुध्दा झाकण नसतात. या सगळया गोष्टीची नुसत उदयान विभागानेच नाहीतर, ड्रेनेज विभागामध्ये सुध्दा असतील, इतर विभागामध्ये सुध्दा असतीलतर त्यांनी त्याची दक्षता घेतली गेली पाहिजे. जे कॉन्ट्रॅक्ट आहे आज बिलोने टेंडर चालू आहेत, उदयान विभागाचे सगळी ४० ते ४५ टक्के बिलोने टेंडर आहे, यांना देवू नका साहेब. अजिबात टेंडर देवू नका. जिथं पाच लोक लागणार तेथे दोन लोक ठेवणार. पुर्वीचाच ठेकेदार असतो, तो बदल झाला का ? दुस-यांन घेतल का ? त्यांचेच माणस ते वापरतात. दुसरीकडून आणून चांगल करणारी अशी काहीही लोक आणत नाहीत. कुठल्या गार्डनमध्ये काय चालते हे प्रत्येकाला माहिती आहे परंतु प्रत्येक जागरुक नागरीकांचे सुध्दा कर्तव्य आहे गार्डनमध्ये काही चाललेतर आपण ताबडतोब ते हाटकावं. प्रकाश रेवाळे महापौर असताना देहू रोड येथे करोडो रुपयाचे झाड लावले होते. आपण बाहेरच्या लोकांना देतो, पीएमएलच्या लोकांना आता मध्यंतरी झाड लावण्यासाठी दोन कोट दिले. पिंपरी चिंचवड शहरात एवढया जागा आहेत त्याठिकाणी खुप चांगल्या पध्दतीचे झाड लावू शकतो सीएमईला झाड लावण्यासाठी दोन कोटी दिलेले आहेत. आता आपण जावून बघा त्यांची हद्द आहे तिथं त्यांनी डेव्हलपमेंट करण्यासाठी काढलतर कोण बोलणार त्यांना. साळूंके साहेबांनी लक्ष घालाव की जर आपण सीएमईला दोन कोटी रुपये झाड लावण्यासाठी दिलेले असतीलतर ती झाड लागलीत का हे पाहण्यासाठी त्याच्यावर तुम्ही माणस नेमा. आम्हांला माहिती आहे तेथे तुम्ही टेंडर दिले म्हणजे सगळयाच गोष्टी सगळीकडे एकच माणुस बघु शकतो अशातला भाग नाही. परंतु तुमच्या हाताखालची जी माणस आहेत त्या प्रत्येक माणसाची जबाबदारी आहे की तो माणुस काम करतो का नाही हे बघण्याची. परवाच ताज उदाहरण सांगते आता नवीन टेंडर परत निघाल आहे. जी झाड आहेत ज्या झाडाना सिमेंटने गळा आवळला अशी झाडे तुम्ही करा, पेपरला सुध्दा बातमी होती. त्याबाबतीत आता काय चालल आहे झाड लावली आपणच, डांबरीकरण केले आपणच आणि काँक्रीट टाकल आपणच. मग डांबरीकरण केलेल्या माणसान ती झाड तोडायला नको का. यांचा म्हणण्याचा उद्देश हाच आहे की एकावरच किती खर्च करायचा. झाडे वाढल्यानंतर ट्रि-गार्ड आपण काढतो का ? कधीच काढत नाहीत. टेंडर फक्त काढलं, ही जबाबदारी कोणाची आहे, बाजूने माती काढली, सिमेंट काढल. डांबरीकरण खोदून काढल आणि ते डांबरीकरण परत रस्त्यावरच टाकलेल आहे. या गोष्टी कोण बघतो. हरणामसिंह आयुक्त होते त्यावेळेपासून दुर्गादेवी टेकडीचे नाव आहे. आता कोणाच आहे एकाही अधिका-याच नाव नाही, भोंडवे साहेब

नाहीत त्यांच नाव घ्यायला. आम्ही साळूंके साहेबांना सांगतो की साळूंके साहेब तुम्ही पण एखाद-दुसर गार्डन बनवा. शिंदे साहेब आल्यानंतर असं वाटत होत की गार्डनमध्ये काहीतरी दुरुस्त्या होतील. परंतु अजून कुठल्याही गार्डनमध्ये काहीही प्रगती नाही. दोन-चार तरी उदयान असे करा की जेणेकरुन ती आपल्या विभागामार्फत डेव्हलप झाले पाहिजेत. आम्ही स्वत: पंधरा-पंधरा दिवस समोर उभे राहतो, जेसीबी लावून घेतो, गार्डन करण्यासाठी प्रयत्न करतो. परंतु उदयान विभागाकडन रिस्पॉन्स मिळाला पाहिजे. प्रत्येकांनी प्रत्येकाच्या वॉर्डामध्ये बारीक लक्ष ठेवलच पाहिजे. परंतु हे करत असताना मातीचे आपण टेंडर काढलेले आहे. झाडे लावता ती चांगल्या पध्दतीचे झाडे लावले पाहिजे, हे केल गेल पाहिजे. मा.महापौर साहेब, हे प्रश्न खुप चांगले दिलेले आहेत. अधिकारी असे बोलत असतीलतर ती त्यांची चुक आहे. सभागृह ओरडते म्हणजे काय ? सभागृहाला ओरडण्यासाठी वेड लागले की काय. कुठल्याही अधिका-यांची असे परत बोलायची हिम्मत होता कामा नये. या गोष्टी झाल्या, जी काही घटना घडलेली आहे त्यावरुन त्यांनी प्रश्न मांडले असतील, या गोष्टी झाल्यात परंतु असे कुठल्याही अधिका-याच्या हातातून घडू नये असे वाटते. दोन तास झाले प्रश्नोत्तर चालेले आहेत पुढील विषय घ्यावा अशी मी विनंती करते.

**मा.महापौर -** सन्मा.सदस्यांची सूचना विचारात घेवून उदयान विभागाने सुधारणा कराव्यात व यापुढे अशी दुर्घटना घडणार नाही याची काळजी उदयान विभागाने घ्यावी आणि विषयाला सुरवात करावी.

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक- ६०८ विषय क्रमांक - १

दिनांक - २३/१२/२०१४ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.बीपी/ताथवडे/२३८/१४ दि.२६/९/२०१४
२) मा.स्थायी समिती सभा ठ.क्र.९३५१ दि.२५/११/२०१४

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १०३ अन्वये मनपाचे नगररचना विभागाकडील भुसंपादन निधी या भांडवली लेखाशिर्षावरील सन २०१४-१५ चे मंजुर अंदाजपत्रकातील तरतुदीमधून रक्कम रु.१,१०,००,०००/- बांधकाम परवानगी विभागाचे "विकास शुल्क जमा परतावा" या लेखाशिर्षावर वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता–

अनुकूल- ८२ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक- ६०९ विषय क्रमांक - २

दिनांक - २३/१२/२०१४ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.तानाजी खाडे, मा.किरण मोटे यांचा प्रस्ताव -

२) मा.क्रीडा समिती सभा ठराव क्र.२७ दिनांक १९/११/२०१४ नुसार,

३) मा.स्थायी समिती सभा ठ.क्र. ९५२० दि.२५/११/२०१४

पिंपरी चिंचवड शहरातील बरेच होतकरु विद्यार्थी धनुर्विद्या व सायकलिंग या खेळामध्ये प्राविण्य मिळवून ते विविध राज्यस्तरीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धामध्ये भाग घेऊन पिंपरी चिंचवड शहराचा नावलौकीक वाढवित आहेत. परंतु नुकत्याच ठरविणेत आलेल्या पिंपरी चिंचवड मनपाच्या क्रीडा धोरणामधील खेळाडू दत्तक योजनेत वरील खेळांचा समावेश नाही. त्यामुळे या क्रीडा प्रकारातील खेळाडूंना मनपाकडून कुठल्याच सोई सुविधा मिळत नाही. त्यामुळे धनुर्विद्या व सायकलिंग खेळ खेळणा-या खेळाडूंवर अन्याय होत आहे. तरी धनुर्विद्या व सायकलिंग या खेळांचा समावेश क्रीडा धोरणातील खेळाडू दत्तक योजनेत समाविष्ट करण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.मंगलाताई कदम -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त, माझे सर्व सहकारी. आपण हे क्रिडा क्षेत्रातील क्रिडा धोरण बनविलेले आहे. परंतु हे बरोबर आहे की काही असे बरेचसे खेळ आहेत, योगा सारखे सुध्दा आहेत. परवाच्या दिवशी ज्ञान प्रबोधिनी मधील विदयार्थी ग्रूपने बाहेर कॉलेजला गेले तिथं सुध्दा आपल्याला गोल्डमेडल मिळाले. याच्यामध्ये मी असं सांगू इच्छिते की यामध्ये असे काही खेळ †› करायचे राहून गेले असतीलतर ते यामध्ये †› करुन घेण्यात यावे आणि हा विषय मंजूर करावा.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता–

अनुकूल- ८२ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ३ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक- ६१० विषय क्रमांक - ३

दिनांक - २३/१२/२०१४ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ -१) मा.सुनिता वाघेरे, मा.संध्या गायकवाड यांचा प्रस्ताव.

२) मा.स्थायी समिती सभा ठ.क्र.९५४१ दि.२५/११/२०१४

महानगरपालिकेच्या शिक्षण मंडळातील प्राथमिक शिक्षकांना मनपा कर्मचा-यांप्रमाणे धन्वंतरी योजना व गृहकर्ज व वाहन कर्ज योजनांचा लाभ देणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता–

अनुकूल- ८२ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ४ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक- ६११ विषय क्रमांक - ४

दिनांक - २३/१२/२०१४ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ -१) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्थासंक/५/कावि/२८५/२०१४ दि.०५/१०/२०१४

२) मा.स्थायी समिती सभा ठ.क्र.९५६७ दि.५/१२/२०१४

एप्रील २०१३ पासून जकात करा ऐवजी स्थानिक संस्था कर पध्दती लागू करणेत आलेली आहे. स्थानिक संस्था कर पध्दती स्थानिक संस्था कर नोंदणीधारकांसाठी नवीन आहे. त्यामुळे स्थानिक संस्था कर नोंदणीधारकांनी चूकीने जादा रक्कम भरणे, चुकीच्या दराने भरणा करणे इ.बाबी घडतात व त्याचा परतावा मागणी केली जाते. तसेच महाराष्ट्र महानगरपालिका (स्थानिक संस्था कर) नियम 2010 मधील नियम 32 नुसार मनपा हददीबाहेर निर्यात/विक्री होणा-या मालाबाबतीत नियमाधीन तरतूदींची पूर्तता झालेस भरणा रक्कमेच्या ९०% इतका परतावा देय होतो. त्यासाठी खर्च रकमेचे वर्गीकरण योग्य त्या लेखाशिर्षानिहाय होण्यासाठी खालील नमूद केलेले लेखाशिर्ष नव्याने निर्माण करणे व त्यानुसार तरतूद करणे आवश्यक आहे.

**मुख्य लेखाशिर्ष**- जकात परतावा (भाग-१)- मुळ तरतूद ररु.-१४,५०,००,०००/-

सुधारीत तरतूद र.रु.-२,५०,००,०००/-

नवीन लेखाशिर्ष**- स्थानिक संस्था कर परतावा (भाग-१)**र.रु.१२,००,००,०००/-

उपरोक्तप्रमाणे लेखाशिर्ष व त्या समोरील तरतूद सन २०१४-१५ चे अंदाजपत्रकात नव्याने निर्माण करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.अतिरीक्त आयुक्त -** मा.महापौर साहेब, सन्मा.सभागृह हा विषय मुख्य लेखाशिर्ष तयार करण्यासाठी आलेला आहे. फायनान्स हेड तयार करण्यासाठी आलेला आहे.

**मा.आर.एस.कुमार -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, या विषयाबद्दल आक्षेप नाही. एलबीटी बद्दल बोलायचे आहे. महापालिकेची आर्थिक स्वायत्ता धोक्यात आहे. जीएसटीची अंमलबजावणी झाल्यानंतर एलबीटी रद्द होईल. एलबीटी रद्द झाली म्हणजे आपल्याला शासन जे ग्रॅण्ट देणार ते रेग्युलर देणार नाही. अनेक ग्रॅण्ट आपले पेन्डीग आहेत ते अनेक वर्षापासून दिलेले नाहीत. एलबीटीतून मिळणारे १२०० कोटी शासन देणार का ? मला नाही वाटत देणार म्हणून. लोकल टॅक्सबद्दल निर्णय घेण्याचे अधिकार फक्त महापालिकेला आहेत आणि हे बीपीएमसी †क्टमध्ये क्लेअरली मेन्शन केलेले आहे. लोकल टॅक्स लावण्याचे अधिकार आपल्याला आहेत आणि म्हणून शासन एलबीटी अशी रद्द करु शकत नाही. ज्यांना रद्द करायची असेलतर विधानसभेमध्ये ठराव पास करायला लागेल आणि महापालिकेनी सुध्दा संमती दयायला पाहिजे. आपण पक्षाच्या बाहेर जाऊन सर्व नगरसेवकानी एलबीटी रद्द करतात याला विरोध दर्शविला पाहिजे. माझी महापौरांना विनंती आहे की येत्या दहा-पंधरा दिवसात यासंदर्भात एक आपली विशेष सभा घ्यावी नाहीतर महापालिकेची आर्थिक स्वायत्ता धोक्यात येणार आहे.

**मा.योगेश बहल -** मा.महापौर साहेब, प्रथमत: मी अनुमोदन देतो. वास्तविक पाहता पिंपरी चिंचवड महानगरपालिकेसारखी महापालिका ज्याठिकाणी आपले ७० टक्केहून अधिक खाते आहेत त्याठिकाणी एलबीटी संदर्भात कोणत्याही उदयोजकाची किंवा मोठया व्यावसायीकामध्ये कोणाचीही अशी तक्रार नाही. जे छोटेछोटे उदयोजक आहेत अर्थात ज्यांना कोणताही कर भरायचा नाही असेच लोक याला विरोध करतात. जे प्रॉपर्टि टॅक्सेस भरतात अशा लोकांचा या एलबीटीला मुळीच विरोध नाही. एलबीटी मधल्या काळात मंदी होती त्यावेळेला कमी आली असेल. परंतु अकौंटींग परपजसाठी एलबीटी अतीशय व्यवस्थीतपणे चालू आहे. जकात रद्द करुन शासनानेच घेतलेला हा निर्णय आहे. परंतु आताच कुमार साहेबांनी सांगीतल्याप्रमाणे महापालिकेची स्वायत्ता आहे त्या स्वायत्तेवर गदा आणू नये. आपण आजही पाहतो की, बृहन्मुंबई मध्ये अजून सुध्दा जकात चालू आहे त्याच पध्दतीने शासनाला यामध्ये काही बदल करायचा असेलतर छोटया छोटया महापालिकेला जीएसटी लावून बघावं आणि येणा-या दोन वर्षामध्ये त्याचे परिणाम काय होतात हे बघून नंतरच अशा प्रकारचे धोरणात्मक बदल शासनाने करावेत अन्यत: आपली आर्थिक घडी कोलमडून जाईल. आर.एस.कुमार यांनी सांगीतल्याप्रमाणे जीएसटी सुरु झाल्यानंतर केंद्रशासन, राज्यशासनाकडून जे अनुदान मिळणार ते अनुदान सुध्दा भविष्यामध्ये मिळेल का नाही याची सुध्दा शाश्वती नसणार. सर्व पक्षाच्या वतीने महापालिकेच्या सभेचे निवेदन देणे आवश्यक आहे. हा विषय मंजूर करणेत यावा.

**मा.शमीम पठाण-** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह आता मा.योगेशजी बहल यांनी विषय मांडलेला आहे. त्या अनुषंगाने जो विषय आलेला आहे त्याच त्यांनी चांगले

विवेचन केलेले आहे. खरोखरच आपण जीबीची विशेष सभा घेवून एलबीटी बाबतीत ठराव करुन शासनाकडे पाठविला पाहिजे. कारण आताच आपण  नुकतच जकातीतून उठून एलबीटीमधून सावरु लागलेलो आहोत. आता ते व्यवस्थीत चालले आहे. हा विषय आलेला आहे तो कुठे मंजूर हातो न होतो तो सावरतो न सावरतो तर आता जीएसटी येणार. खरं म्हणजे भारतामध्ये एकाधिकारशाही निर्माण करण्याचा हा सर्वात मोठा प्रयोग आहे आणि सर्व स्थानिक स्वराज्य संस्थेला हातबल करण्याचा, त्यांच्याकडून सर्व आर्थिक ताकद काढून घेण्याचा, त्यांच्या आर्थिक नाडया बंद करण्याचा, हा एकाधिकारशाहीचा प्रयोग याठिकाणी केंद्रशासन राबवत आहे त्याला आपण सर्व लोकशाही पध्दतीने निवडून आलेल्या सभासदांनी विरोध केला पाहिजे आणि म्हणून मी आता सांगीतल की योगेशजी बहल यांनी जी सूचना मांडलेली आहे ती अत्यंत स्वागतार्ह आहे. कारण याठिकाणी त्यांनी सांगीतले की कुठलेही विकास काम होणार नाहीत. रस्ते खिळखीळे होतील, अस्थापना खर्च, पगाराचे पैसे सुध्दा आपल्याला देणे शक्य होणार नाही. प्रत्येक वेळी त्यांच्याकडे आपल्याला हात पसरावे लागतील. तेही येथे तेथे नाहीतर केंद्रशासनापुढे. जीएसटीचे काय परिणाम होतील, कशाप्रकारे ते वसूल करायचे, कोणी वसूली करायचे, कशी वसूली करायची त्याबद्दल काहीच नाही. त्याबद्दल मोघम जीएसटी लागू करणार असं त्यांनी ठामपणे सांगीतले आहे. अशा हुकूमशाही धोरणाला आपण विरोध केला पाहिजे. योगेशजी बहल यांनी जी सूचना मांडली आहे ती सुध्दा आपण लक्षात घ्यावी, मंजूर करावी. त्यांनी सांगीतले आहे यावर विशेष जीबी घ्यावी यास अनुमोदन देते.

**मा.नारायण बहिरवाडे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. प्रथमत: आर.एस.कुमार आणि योगेश बहल यांनी जी सूचना मांडली त्याला मी अनुमोदन देतो. १८ डिसेंबर २०१४ ला नागपूर अधिवेशनामध्ये राज्याचे महसुलमंत्री मा.ना. एकनाथ खडसे यांनी १ एप्रिल २०१५ पासून एलबीटी बंद करणार अशी घोषणा केली. त्याच काळामध्ये केंद्रशासनाने एलबीटी बंद करुन जीएसटी लावणार आहे असे सांगीतले. एलबीटी बंद झालीतर आपली आर्थिक स्वायत्ता निश्चित जाणार आहे. १ एप्रिल २०१३ रोजी एलबीटी सुरु केली. जकातीला काहीतरी चांगला पर्याय दयावा म्हणून त्यावेळी व्यापा-यांनी मागणी केली, उदयोजकानी मागणी केली त्याचा विचार सुध्दा राज्यशासनाने केला. जकातीमुळे वाहनांचा खोंळबा होतो, जकातीमुळे काही चो-या देखील होतात त्यामुळे ही क्लिष्ट पध्दत बंद व्हायला पाहिजे आणि नवीन करप्रणाली लागू केली पाहिजे म्हणून राज्यशासनाने या सगळया गोष्टीचा, व्यापा-याचां आणि उदयोजकांच्या मागणीचा विचार करुन एलबीटी आणलेली आहे. वास्तविक पाहता ही करप्रणाली अतीशय चांगली आहे, सुटसूटीत आहे. याला व्यापा-यांनी विरोध करण्याचे कारण नाही. आताच योगेश बहल यांनी सांगीतले विरोध करणारे जे लोक आहेत ती फार तोकडी लोक आहेत.  उदयोजक, कारखानदार याला विरोध करत नाहीत. छोटेमोठे वर्कशॉप चालवणारे लोक याला विरोध करत नाहीत. याला विरोध करणारे मुठभर व्यापारी आहेत ते एलबीटीला विरोध

करतात. एलबीटी भरणा-यांची संख्या बघीतलीतर व्हॅटनुसार आपल्याकडे जी आकडेवारी उपलब्ध झालेली आहे ती २५ हजार नावे आपल्याकडे उपलब्ध आहेत. त्यापैकी १४ हजार एलबीटीधारक आपल्याकडे रजिष्टर्ड आहेत. याच्यामध्ये पिंपरी चिंचवडमध्ये पाच हजार कारखाने आहेत व एलबीटीधारक दहा हजार व्यापारी आहेत. या शहराची लोकसंख्या बघीतलीतर एक टक्केपेक्षा कमी लोक एलबीटी भारणारे आहेत. शहरामध्ये मोठमोठे प्रकल्प राबविले जातात. आज आपला भांडवली खर्च बघीतलातर ८२२ कोटी खर्च करतो. हे उत्पन्न बंद झालेतर या शहराचा विकास होणार नाही. कारण सध्या अनेक प्रकल्प शहरामध्ये चालू आहेत, कोटयावधी रुपयाचे काम शहरामध्ये चालू आहे. एलबीटीच्या माध्यमातून आपल्याला जे उत्पन्न मिळते ते उत्पन्न आपल्याला मिळाले नाहीतर आपण या शहरामध्ये भविष्यात विकासाचे काम करु शकणार नाहीत. या चालू वर्षाच्या अंदाजपत्रकामध्ये आपल्याला १०५० कोटी एलबीटीपासूनचे उत्पन्न मिळणार होते. आज मितीला ७७२ कोटी एलबीटी मधुन जमा झालेले आहेत आणि अजून आपल्या हातामध्ये तीन महिने आहेत. एलबीटीचे या वर्षाचे उदिष्ट आपले पुर्ण होणार आहे. यामुळे आपली जी काही विकास काम आहेत ते निश्चितपणे पुर्ण होणार आहेत. मग एलबीटीला विरोध करण्याचे कारण काय हेच समजत नाही. याच लोकांनी याच व्यापा-यानी सुरवातीला जकाती विषयी टिका केली, अनेक वर्षे शासनाकडे मागणी केली आणि एलबीटी आल्यानंतर विरोध करायच कारणच काय. वास्तविक पाहता एलबीटी १ तारखेपासून ३० तारखेपर्यंत तुमच्याकडे येतो त्याची एलबीटी तुम्ही २० तारखेपर्यंत भरु शकता. म्हणजे ते ३० दिवस आणि हे २० दिवस असे ५० दिवस व्यापा-यांना मिळतात. जीएसटीला विरोध केला पाहिजे. कारण जीएसटी आपल्याला परवडणारी नाही. दर वर्षाच्या अंदाजपत्रकामध्ये शासकीय अनुदान आपण दाखवतो, हे कधी मिळतात, मिळत नाही. शासनाकडे भीक मागावी लागते तरी हे अनुदान मिळत नाही. जीएसटी करप्रणाली केंद्रशासन गोळा करणार ते राज्य शासनाकडे देणार, राज्यशासन आपल्याला देणार. हे अनुदान केंद्रशासनाकडून राज्याशासनाला मिळाल्यानंतर आपल्याला मिळणार आहे. यासाठी विशेष जी.बी. घ्यावी. जीएसटी ला विरोध करावा त्यासाठी विशेष जीबी घ्यावी.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८२ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ५ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - ५

दिनांक - २३/१२/२०१४

विभाग - मा.आयुक्त

संदर्भ -१) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.लेखा/३/कावि/५९४/२०१४, दि.१३/८/२०१४

२) मा.स्थायी समिती ठराव क्र.७७०४ दिनांक २२/०८/२०१४

३) मा.स्थायी समिती ठराव क्र.९७१९ दिनांक ०५/१२/२०१४

मा.अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.पुणे यांनी दिनांक २१/०३/२०१४ व ३१/०७/२०१४ च्या मागणीपत्रानुसार तसेच शासन निर्णय क्र.एनयुआर-२०१३/प्र.क्र.३३८/ नवि-३३ मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. दिनांक १८/०२/२०१४ चे पत्र व शासन पत्र क्र.पीएमएल- ३०१३/प्र.क्र.८०/ नवि-२२, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई ४०००३२. दिनांक ०७/०८/२०१४ अन्वये संचलन तुटीची रक्कम तसेच पासेसपोटीची प्रतिपूर्तीची रक्कम अदा करणेबाबत आदेशीत केले आहे. त्याप्रमाणे संचलनतुटी (**operational losses**) पोटी र.रु.१० कोटी व विविध प्रकारचे सवलतीचे पासेसपोटी र.रु.५ कोटी असे एकूण र.रु.१५ कोटी सन २०१३-१४ मध्ये येणा-या संभाव्य संचलन तुटीपोटी व मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे मार्फत लेखा परिक्षण झाल्यानंतर त्यांच्या शिफारशीप्रमाणे देय होणा-या रकमेतून अग्रीम स्वरुपात दिलेल्या रकमेचे समायोजन करण्याच्या अटीस अधिन राहुन पुणे महानगर परिवहन महामंडळ लि. पुणे यांना र.रु.१५ कोटी (अक्षरी र.रु.पंधरा कोटी फक्त) अदा करणेस तसेच सदरचा खर्च लेखा विभागाकडून वाहन व्यवहार निधी या लेखाशिर्षातून खर्ची टाकण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच पुणे परिवहन महामंडळाच्या कर्मचा-यांना ६व्या वेतन आयोगाच्या धर्तीवर नवीन वेतनश्रेणी माहे डिसेंबर २००७ पासून लागू करण्यात येवून त्याप्रमाणे वेतन अदा करणेत येत आहे. एप्रिल २००७ ते नोव्हेंबर २०११ या कालावधीत ५६ महिन्यांच्या देय असणा-या फरकाची रक्कम महामंडळाच्या बिकट आर्थिक परिस्थितीमुळे अदा करण्यात आलेली नाही. सदर फरकाची रक्कम कर्मचा-यांना मिळणेकामी पीएमपीएमएल कर्मचारी महासंघाने वेळोवेळी मागणी केलेली आहे. तसेच शासन निर्णय क्रमांक पीएमएल-३०१३/प्र.क्र.१/नवि-२२ दि.८ ऑगस्ट २०१४ नुसार महामंडळाकडील कर्मचा-यांना सुधारित वेतनानुसार फरकापोटी देय असलेली रक्कम देखील संचलन तुटीचा भाग असल्याने सदर रकमेची महानगरपालिकेकडे मागणी करावी, असे कळविले आहे. त्याप्रमाणे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या दायित्वाचे तत्वाने (४०%) र.रु.१२० कोटी महामंडळास मिळणेकामी मा.अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक पी.एम.पी.एम.एल यांनी दिनांक ११/०८/२०१४ रोजी विनंती केलेली आहे. सबब पीएमपीएमएल कर्मचारी महासंघाकडून वेळोवेळी होणारी मागणी तसेच शासन निर्णयाचा विचार करता पुणे परिवहन महामंडळाच्या सेवकांना ५६ महिन्यांच्या देय असणा-या फरकाची रक्कम ४० टक्के प्रमाणे र.रु.१२० कोटी पुणे परिवहन महामंडळास मा.महापालिका सभेच्या उमेद मान्यतेवर अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.दत्तात्रय साने -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ५ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा अशी सूचना मी मांडतो.

**मा.†›.संदीप चिंचवडे -** मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेता आला असता-

ठराव क्रमांक - ६१२ विषय क्रमांक - ५

दिनांक - २३/१२/२०१४ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ -१) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.लेखा/३/कावि/५९४/२०१४, दि.१३/८/२०१४

२) मा.स्थायी समिती ठराव क्र.७७०४ दिनांक २२/०८/२०१४

३) मा.स्थायी समिती ठराव क्र.९७१९ दिनांक ०५/१२/२०१४

विषय क्रमांक ५ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल- ८२ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ६ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - ६

दिनांक - २३/१२/२०१४ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ -१) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.लेखा/३/कावि/८१७/१४ दि.१०/११/२०१४

२) मा.स्थायी समिती ठराव क्र.९२१३ दिनांक १४/११/२०१४

३) मा.स्थायी समिती ठराव क्र.९७२० दिनांक ०५/१२/२०१४

सन २०१४-१५ साठी वाहन व्यवहार निधी या लेखाशिर्षावर र.रु.४० कोटी एवढी तरतुद करणेत आली असुन संपूर्ण तरतूद खर्ची पडली आहे पीएमपीएमएल यांना दि.२९/१०/१४ च्या पत्रानुसार संचलन तुटीपोटी रक्कम अदा करावयाची असल्याने नगररचना विभागाकडील भूसंपादन निधी या लेखाशिर्षातुन वाहन व्यवहार निधी या लेखाशिर्षावर र.रु.१२ कोटी वर्ग करुन त्यापैकी र.रु.१० कोटी फक्त पीएमपीएमएल यांना अदा करता येईल. तरी सदरचे वर्गीकरण प्रस्तावास मान्यता देवून पीएमपीएमएल यांना शासन निर्णय क्र.एनयुआर२०१३ प्रक३३८/नवी३३ दि.१८/२/२०१४ व मा.सह व्यवस्थापकीय संचालक यांचे उक्त पत्रानुसार संचलनतुटी (**operational losses**) पोटी र.रु.१० कोटी सन २०१३-१४ मध्ये येणा-या संभाव्य संचलन तुटी (**operational losses**) पोटी व मा.मुख्यलेखापरिक्षक यांचेमार्फत लेखापरिक्षण झाल्यानंतर त्यांच्या शिफारशीप्रमाणे देय होणा-या रकमेतून अग्रीम स्वरुपात दिलेल्या रकमेचे समायोजन करण्याच्या अटीस अधीन पुणे महानगर परिवहन महामंडळ लि. पुणे यांना र.रु.१० कोटी (अक्षरी र.रु.दहा कोटी फक्त) अदा करावयाचे असल्याने तसेच सदरची बाब आर्थिक स्वरुपाची

असल्याने व भूसंपादन निधी या लेखाशिर्षातुन वाहन व्यवहार निधी या लेखाशिर्षावर रु.१२ कोटी वर्गीकरण करावयाचे असल्याने मा.महापालिका सभेच्या उमेद मान्यतेवर रक्कम अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.आर.एस.कुमार -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ६ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा अशी सूचना मी मांडतो.

**मा.दत्तात्रय साने -** मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेता आला असता-

ठराव क्रमांक - ६१३ विषय क्रमांक - ६

दिनांक - २३/१२/२०१४ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.लेखा/३/कावि/८१७/१४ दि.१०/११/२०१४

२) मा.स्थायी समिती ठराव क्र.९२१३ दिनांक १४/११/२०१४

३) मा.स्थायी समिती ठराव क्र.९७२० दिनांक ०५/१२/२०१४

विषय क्रमांक ६ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल- ८२ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ७ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ६१४ विषय क्रमांक - ७

दिनांक - २३/१२/२०१४ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/२/कावि/५०९/२०१४, दि.०५/११/२०१४

२) मा.विधी समिती सभा ठ.क्र.४२ दि.२१/११/२०१४

शासन आदेशानुसार श्री.मिनीनाथ दंडवते, मुख्याधिकारी यांच्या सहाय्यक आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका या पदावरील नियुक्तीस मान्यता देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता–

अनुकूल - ८२ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ८ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - ८

दिनांक - २३/१२/२०१४ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/२/कावि/५१०/२०१४,

दि.०५/११/२०१४

२) मा.विधी समिती सभा ठ.क्र.४३ दि.२१/११/२०१४

शासनाकडील आदेशानुसार श्री.महेशकुमार उत्तम डोईफोडे, मुख्याधिकारी यांच्या सहाय्यक आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका या पदावरील नियुक्तीस मान्यता देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.योगेश बहल -** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- डॉ.यशवंत माने, उपजिल्हाधिकारी हे प्रतिनियुक्तीने दिनांक-१९/०९/२०१३ पासून सहाय्यक आयुक्त पदी कार्यरत आहेत. महानगरपालिकेचे महसुली उत्पन्नाची वसुली स्थानिक संस्था कर विभागाचे ते काम पाहतात मनपाच्या विकास कामासाठी महसूल उत्पन्नाची वसुली व त्याचे नियोजन महत्वाचे आहे. डॉ.यशवंत माने यांची प्रतिनियुक्ती रद्द करुन त्यांची शासनाने जालना येथे बदली दर्शविली आहे. केवळ १ वर्षे ३ महिने या अल्पावधीत बदली झालेली आहे. एवढया अल्प कालावधीत बदली झाल्यास वसुलीचे नियोजन व लेखापरीक्षण यावर निश्चित परिणाम होतो त्यामुळे मनपाचे आर्थिक घडी विस्कळीत होऊन महापालिकेच्या विकास कामावर परिणाम होण्याची दाट शक्यता आहे. तरी डॉ.यशवंत माने यांची मनपाकडील प्रतिनियुक्ती ही स्थानिक संस्था करास पर्यायी कराची व्यवस्था होईपर्यंत यापुढील कालावधीत तशीच चालू ठेवावी व त्यांना कार्यमुक्त करु नये व डॉ. यशवंत माने यांना पिंपरी चिंचवड म.न.पा.च्या सेवेत प्रतिनियुक्तीने पुढील दोन वर्षा करिता मुदतवाढ देणेत यावी व सभागृहाची विनंती राज्यशासनास कळविण्यास मान्यता देणेत यावी.

**मा.राजेंद्र जगताप -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देतो.

**मा.उल्हास शेट्टी -** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- प्रशासकीय संवर्गातील कामगार कल्याण अधिकारी वर्ग -२ च्या पदावर कार्यरत असलेले श्री.चंद्रकांत पोपट इंदलकर, हे सहाय्यक आयुक्त पदाची शैक्षणिक अर्हता व दि.२५/०२/२००५ च्या शासन निर्णयानुसार आवश्यक तो अनुभव धारण करत असलेने महापालिका आस्थापनेवरील सहाय्यक आयुक्त या रिक्त असलेल्या पदावर पदोन्नतीने नेमणूक देण्यास / नियुक्ती देणेस मान्यता देणेत यावी. सदर ठरावाप्रमाणे प्रशासन विभागाने पदोन्नतीची पुढील कार्यवाही करण्यास मान्यता देणेत यावी.

**मा.शत्रुघ्न काटे -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देतो.

**मा.किरण मोटे -** मा.महापौर साहेब, सन्मा.आयुक्त, सन्मा.सभागृह. हायकोर्टात जी अनधिकृत बांधकामा संदर्भात याचिका चालू आहे त्या संदर्भात १२ डिसेंबर २०१४ ला काही आदेश दिलेले आहेत. बांधकामाच्या काही जागा डिमोलेशन करण्यासाठी स्टाफ तयार करायचा त्यासंदर्भात त्यांनी काही निर्देश दिलेले आहेत. मला एक सांगायच आहे, जर हे कोर्टाला समजते की जवळ जवळ १७२ लोकांची या कामासाठी आपल्याला गरज आहे. पेपरचे मथळे वाचतोत की १०० टक्के पैकी ३० टक्के बजेट विकास कामासाठी खर्च झालेले आहे. साहेब तुम्हांला असं वाटत नाही का की हे ७० टक्के आपली तूट झालेली आहे. स्थापत्य विभागामार्फत जास्तीत जास्त काम केली जातात. जे.ई.ची संख्या जवळपास १०० ते १२५ च्या आसपास असेल. आपल्याला कोर्टाने सांगीतले बाकीचे जे जे.ई. लोक आपल्याला बांधकाम पाडण्यासाठी भरायचे आहेत म्हणजे याचा अर्थ या जे.ई.ला हे काम आपण का देतो. एका एका जे.ईला दोन-दोन हजार अनधिकृत बांधकामाच्या नोटीसा वाटण्यासाठी लावलेले आहे मग ते आमचे विकास काम करणार कधी ? जर त्यांनी नुसत्या नोटीसाच वाटायच्यातर विकास काम होणार कधी ? बजेट खर्च कसं होणार. कोर्टाने सुध्दा या विभागाला लोक दयावे म्हणून सांगीतले आहे कोर्टाला समजते एवढे माणस लागतात म्हणून. आपल्याला ही गोष्ट का कळत नाही. स्थापत्य विभागाला जे.ई. ला नोटीस वाटप करण्यासाठीचे काम दिलेले आहे ते काम बंद झाले पाहिजे असे महापौर साहेब आदेश दयावेत. महसूल मंञ्यानी विधानसभेत सांगीतलेले आहे की फक्त आरक्षणावरील, रस्त्यावरील बांधकाम पाडणार आहेत. ५३ अ च्या नोटीसामध्ये रहिवासी भागातल्या पण नोटीसा वाटल्या जात आहेत. माझे घरच पडणार नाहीतर मला नोटीस कशाला देता. सन्मा.महसुल मंञ्यांनी विधानसभेत सांगीतले, ते खोटं बोलतात का. असं आपल्याला म्हणायच आहे का ? प्रशासनाच म्हणणं हे आहे का ? त्यांनी विधानसभेमध्ये असे बोललेले आहेत. तुम्ही आजच्या आज आदेश दया व ते पहिल्यांदा नोटीसा वाटण्याचे काम बंद करा. डिमोलेशन विभाग उभा करावा त्यांच्या मार्फत हे काम करा. स्थापत्य विभागामार्फत करु नये त्यांना विकासाचे काम करु दयावे. डिमोलेशनचा विभाग लवकरात लवकर करावा. आपली कपॅसिटी नसेलतर या नोटीसा देण्याचे काम बंद करुन टाका.

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, दोन्ही उपसूचना स्विकारल्या आहेत.

यानंतर उपसूचनांप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता–

ठराव क्रमांक - ६१५ विषय क्रमांक - ८

दिनांक - २३/१२/२०१४ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/२/कावि/५१०/२०१४, दि.०५/११/२०१४

२) मा.विधी समिती सभा ठ.क्र.४३ दि.२१/११/२०१४

शासनाकडील आदेशानुसार श्री.महेशकुमार उत्तम डोईफोडे, मुख्याधिकारी यांच्या सहाय्यक आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका या पदावरील नियुक्तीस मान्यता देणेत येत आहे तसेच डॉ.यशवंत माने, उपजिल्हाधिकारी हे प्रतिनियुक्तीने दिनांक-१९/०९/२०१३ पासून सहाय्यक आयुक्त पदी कार्यरत आहेत. महानगरपालिकेचे महसुली उत्पन्नाची वसुली स्थानिक संस्था कर विभागाचे ते काम पाहतात मनपाच्या विकास कामासाठी महसूल उत्पन्नाची वसुली व त्याचे नियोजन महत्वाचे आहे. डॉ.यशवंत माने यांची प्रतिनियुक्ती रद्द करुन त्यांची शासनाने जालना येथे बदली दर्शविली आहे. केवळ १ वर्षे ३ महिने या अल्पावधीत बदली झालेली आहे. एवढया अल्प कालावधीत बदली झाल्यास वसुलीचे नियोजन व लेखापरीक्षण यावर निश्चित परिणाम होतो त्यामुळे मनपाचे आर्थिक घडी विस्कळीत होऊन महापालिकेच्या विकास कामावर परिणाम होण्याची दाट शक्यता आहे. तरी डॉ.यशवंत माने यांची मनपाकडील प्रतिनियुक्ती ही स्थानिक संस्था करास पर्यायी कराची व्यवस्था होईपर्यंत यापुढील कालावधीत तशीच चालू ठेवावी व त्यांना कार्यमुक्त करु नये व डॉ. यशवंत माने यांना पिंपरी चिंचवड म.न.पा.च्या सेवेत प्रतिनियुक्तीने पुढील दोन वर्षा करिता मुदतवाढ देणेत येत आहे व सभागृहाची विंती राज्यशासनास कळविण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच प्रशासकीय संवर्गातील कामगार कल्याण अधिकारी वर्ग -२ च्या पदावर कार्यरत असलेले श्री.चंद्रकांत पोपट इंदलकर, हे सहाय्यक आयुक्त पदाची शैक्षणिक अर्हता व दि.२५/०२/२००५ च्या शासन निर्णयानुसार आवश्यक तो अनुभव धारण करत असलेने महापालिका आस्थापनेवरील सहाय्यक आयुक्त या रिक्त असलेल्या पदावर पदोन्नतीने नेमणूक देण्यास / नियुक्ती देणेस मान्यता देणेत येत आहे. सदर ठरावाप्रमाणे प्रशासन विभागाने पदोन्नतीची पुढील कार्यवाही करण्यास मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल- ८२ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ९ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - ९

दिनांक - २३/१२/२०१४ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ:- १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/१०/५९२/२०१३ दि.०४/०९/२०१३

२) मा.शहर सुधारणा समिती सभा ठ.क्र.४७ दि.१८/१२/२०१३

३) मा.महापालिका सभा ठराव क्र.४५८ दि.२०/०१/२०१४

४) मा.महापालिका सभा ठ.क्र.५१९ दि.०५/०७/२०१४

५) मा.महापालिका सभा ठ.क्र.५३६ दि.०५/०८/२०१४

६) मा.महापालिका सभा ठ.क्र.५५२ दि.१९/०८/२०१४

७) मा.महापालिका सभा ठ.क्र.५७९ दि.१०/११/२०१४

८) मा.महापालिका सभा ठ.क्र.५९९ दि.२०/११/२०१४

पिंपरी चिंचवड मनपा हद्दीत चाकण, देहू, आळंदी, हिंजवाडी, म्हाळुंगे मोई, मारुंजी व इतर परिसराचा समावेश करणेबाबत शासनास मनपाचे अभिप्राय सादर करणेपूर्वी सर्व पदाधिकारी यांची बैठक दि.३०/०८/२०१३ रोजी मा.आयुक्त यांचे कक्षात घेण्यात आली. सदर बैठकीत मनपा हद्यीच्या उत्तरेकडील १४ गावे आणि मनपा हद्दीच्या पश्चिमेकडील ६ गावे मनपा हद्दीत समावेश करणेबाबत सविस्तर चर्चा करणेत आली आणि सदर हद्दवाढीचा प्रस्ताव मा.शहर सुधारणा समिती मार्फत मा.महापालिका सभेपुढे सादर करणेबाबत चर्चा झाली तथापि सद्य:स्थितीत मनपा हद्दीला लागून असलेली गावे मनपा हद्दीत समाविष्ट करणे योग्य होईल. त्यानुसार खालील नमुद मनपा हद्दीच्या उत्तरेकडील आळंदी, चिंबळी, कुरुळी, मोई, निघोजे, देहू, विठ्ठलनगर आणि मनपा हद्दीच्या पश्चिमेकडील गहुंजे, जांबे, मारुंजी, हिंजवाडी, माण, नेरे, सांगवडे ही मनपा हद्दीला लागून असलेली एकूण १४ गावे मनपा हद्दीत समाविष्ट करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.उल्हास शेट्टी -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ९ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा अशी सूचना मी मांडतो.

**मा.अजीत गव्हाणे -** मा.महापौर साहेब, सुचनेस अनुमोदन देतो.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता–

ठराव क्रमांक - ६१६ विषय क्रमांक - ९

दिनांक - २३/१२/२०१४ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ:- १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/१०/५९२/२०१३ दि.०४/०९/२०१३

२) मा.शहर सुधारणा समिती सभा ठ.क्र.४७ दि.१८/१२/२०१३

३) मा.महापालिका सभा ठराव क्र.४५८ दि.२०/०१/२०१४

४) मा.महापालिका सभा ठ.क्र.५१९ दि.०५/०७/२०१४

५) मा.महापालिका सभा ठ.क्र.५३६ दि.०५/०८/२०१४

६) मा.महापालिका सभा ठ.क्र.५५२ दि.१९/०८/२०१४

७) मा.महापालिका सभा ठ.क्र.५७९ दि.१०/११/२०१४

८) मा.महापालिका सभा ठ.क्र.५९९ दि.२०/११/२०१४

विषय क्रमांक ९ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल- ८२ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १० वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - १०

दिनांक - २३/१२/२०१४ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र. नरवि/कावि/१०/५९८/२०१३ दि.०७/१०/२०१३

२) मा.शहर सुधारणा समिती सभा ठ.क्र.४८ दि.१८/१२/२०१३

३) मा.महापालिका सभा ठराव क्र.४५९ दि.२०/०१/२०१४

४) मा.महापालिका सभा ठ.क्र.५२० दि.०५/०७/२०१४

५) मा.महापालिका सभा ठ.क्र.५३७ दि.०५/०८/२०१४

६) मा.महापालिका सभा ठ.क्र.५५३ दि.१९/०८/२०१४

७) मा.महापालिका सभा ठ.क्र.५८० दि.१०/११/२०१४

८) मा.महापालिका सभा ठ.क्र.६०० दि.२०/११/२०१४

पिंपरी चिंचवड मनपा हद्दीच्या उत्तरेकडील आणि मनपा हद्दीला लागून असलेली ७ गावे आणि मनपा हद्दीच्या पश्चीमेकडील ७ गांवे अशी एकूण १४ गावे मनपा हद्दीत समाविष्ट करणेबाबत प्रस्ताव मान्यतेकामी पुढील प्रमाणे आहे. मनपा हद्दीत समाविष्ट करावयाचे गांवे- मनपा हद्दीच्या उत्तरे कडील ७ गावे- आळंदी, चिंबळी, कुरुळी, मोई,निघोजे, देहू, विठ्ठलनगर. मनपा हद्दीच्या पश्चीमे कडील ७ गांवे- हिंजवडी, जांबे, माण, मारुंजी, नेरे, गहुंजे सांगवडे वरीलप्रमाणे

प्रस्ताव पत्र क्र.नरवि/कावि/१०/५९२/२०१३ दिनांक ४/९/२०१३ अन्वये मा.शहर सुधारणा समितीमार्फत मा.महापालिका सभेपुढे सादर केलेला आहे. प्रस्तुत विषयी मा.आमदार श्री.दिलीप मोहिते यांनी दि.१०/०९/२०१३ च्या पत्राने खेड तालुक्यातील आळंदी, चाकण, मोई, कुरुळी, निघोजे, चिंबळी, केळगांव, सालुंब्रे, महाळुंगे, खराबवाडी, नाणेकरवाडी, मेदनकरवाडी, कडाचीवाडी या गावांचा पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीत समावेश होणेबाबत विरोध केला असल्याचे आणि सदर गांवे मनपा हद्दीत समावेश करु नये असे नमूद केले असून त्यासोबत ग्रामपंचायतीच्या ठरावाची प्रत जोडली आहे. प्रस्तुत विषय मा.महापालिका सभेपुढे सादर केलेला असल्याने या विषयासोबत मा.आमदार श्री.दिलीप मोहिते यांचे पत्र व त्यासोबतचे सहपत्रे मा.महापालिका सभेपुढे सादर करणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.उल्हास शेट्टी -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १० चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा अशी सूचना मी मांडतो.

**मा.अजीत गव्हाणे -** मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक - ६१७ विषय क्रमांक - १०

दिनांक - २३/१२/२०१४ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र. नरवि/कावि/१०/५९८/२०१३ दि.०७/१०/२०१३

२) मा.शहर सुधारणा समिती सभा ठ.क्र.४८ दि.१८/१२/२०१३

३) मा.महापालिका सभा ठराव क्र.४५९ दि.२०/०१/२०१४

४) मा.महापालिका सभा ठ.क्र.५२० दि.०५/०७/२०१४

५) मा.महापालिका सभा ठ.क्र.५३७ दि.०५/०८/२०१४

६) मा.महापालिका सभा ठ.क्र.५५३ दि.१९/०८/२०१४

७) मा.महापालिका सभा ठ.क्र.५८० दि.१०/११/२०१४

८) मा.महापालिका सभा ठ.क्र.६०० दि.२०/११/२०१४

विषय क्रमांक १० चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल- ८२ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.विनायक गायकवाड -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ११ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक - ११

दिनांक - २३/१२/२०१४

विभाग - मा.आयुक्त

संदर्भ - **१)** मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र. नरवि/कावि/९/२९१/२०१४ दि.३०/०७/२०१४

२) मा.शहर सुधारणा समिती सभा ठ.क्र.२७ दि.१०/१२/२०१४

मौजे पिंपळे निलख येथील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेतील स.नं.६५ पै. ते ६७ पै. १८.०० मी. रुंद रस्त्याचे आखणीमध्ये बदल करुन रस्त्यांची रुंदी २४.०० मी. करणेबाबत म.प्रा. व न.र. अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करणेबाबतची कार्यवाही चालू आहे. सदर प्रस्तावास मा.महापालिका सभेने ठराव क्र.३०० दि.२७/०६/२०१३ अन्वये मान्यता देणेत आलेली आहे. सदर ठरावानुसार फेरबदल दर्शविणारा नकाशा उपसंचालक, नगररचना व विकास विभाग पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचे कार्यालयात ठेवणेत आला होता. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत आला होता. तसेच सदर फेरबदलाची जाहिर नोटीस दि.२१/११/२०१३ च्या दै.लोकमत या मराठी माध्यमाच्या वर्तमानपत्रात व दै.टाईम्स ऑफ इंडिया या इंग्रजी माध्यमाच्या वर्तमानपत्रात प्रसिध्द करणेत आली होती. महाराष्ट्र शासन राजपत्रामध्ये दि.०४/१२/२०१३ नुसार जाहिर नोटीस प्रसिध्द करणेत आली होती. सदर जाहिर नोटीशीच्या अनुषंगाने प्रस्तावित फेरबदलाबाबत नागरिकांच्या ३२ हरकती या विभागाकडे प्राप्त झाल्या आहेत. सदरच्या प्राप्त हरकतधारकांना दि.२१/०४/२०१४ रोजी सुनावणी देण्यात आली आहे. सुनावणीच्या वेळेस हरकतधारकांनी नमुद केलेले मुद्दे व हरकती यांचा विचार करुन मनपाचा अभिप्राय त्या बाबतचा अहवाल प्रस्तावासोबतच्या तक्त्यात नमुद केलेला आहे. सदर फेरबदलाचा प्रस्ताव महाराष्ट्र शासनास मंजूरीसाठी सादर करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.दत्तात्रय साने -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

**मा.योगेश बहल -** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- मा.महापालिका सभा क्र. ३५ विषय क्र. १७ ठराव क्र. ५८४ दि.१०/११/२०१४ च्या मा.महापालिका सभेत प्रभाग २८ मासुळकर कॉलनी येथील आरक्षण क्र. ७७ व ७९ स.नं. १०९/११० असून सदरचे क्षेत्र अनुक्रमे ०.६४ हेक्टर चौ.मी. व ०.४४ हेक्टर चौ.मी. आहे ते बेघरासाठी घरे यासाठी आरक्षित आहे. सदर जागा महापालिकेच्या ताब्यात आहे. मुंबई प्रांतिक अधिनियम १९६६ च्या कलम ३७ अन्वये फेरबदलचा सदर प्रस्ताव तयार करुन हरकती सुचना मागवून शासनास सादर करण्यास मा.आयुक्त यांना अधिकार प्रदान करणेकामी विषय मंजूर केलेला आहे. पुढील प्रमाणे सुधारणा / दुरुस्ती करण्यात यावी.

प्रभाग २८ मासुळकर कॉलनी येथील आरक्षण क्र. ७७ व ७९ स.नं. १०९ / ११० असून सदरचे क्षेत्र अनुक्रमे ०.६४ हेक्टर चौ.मी. व ०.४४ हेक्टर चौ.मी. आहे ते बेघरासाठी घरे यासाठी आरक्षित आहे. सदर जागा महापालिकेच्या ताब्यात आहे. मुंबई प्रांतिक अधिनियम १९६६ च्या कलम ३७ अन्वये मनपा उपयोगी ( वॉर्ड सेंटर व उद्यान ) व मनपा उपयोगासाठी अशी दुरुस्ती करण्यात यावी. दुरुस्तीसह फेरबदलचा प्रस्ताव तयार त्यावर हरकती व सुचना मागविण्यात येऊन तो शासनास सादर करण्यास मा.आयुक्त यांना अधिकार प्रदान करणेस मान्यता देणेत यावी.

**मा.समीर मासुळकर -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देतो.

**मा.रामदास बोकड -** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- पिंपरी चिंचवड महानगरपालिके मधील मौजे वाकड या गावाच्या विकास आराखडयामध्ये मौजे वाकड येथील सर्व्हे नं. १७६ मध्ये १८ मी व २४ मी. रुंदि असलेले डि.पी.रस्त्याचे आरक्षण दर्शविलेले आहे. त्यातील १८ मी. रुंदीचा रस्ते एकमेकास काटकोनात आहेत. त्यापैकी उत्तर दक्षिण असणा-या १८ मी. रुंद रस्त्याचे पूर्व बाजूस आरक्षित असलेल्या १८ मी. रुंदीचा विकास योजना रस्ता हा पुढे प्राधिकरणाच्या हद्दीतून जाऊन २४ मी. रुंदीच्या उत्तर दक्षिण रस्त्यास मिळतो. निगडी प्राधिकरण हद्दीमध्ये असा १८ मी.रुंदीचा रस्ता प्रस्तावित नाही. त्यामुळे विकास आराखडयात दर्शविलेला १८ मी. रुंदीचा रस्ता हा वाकड हद्दीतच मर्यादित होणार असून अशा रस्त्याचा भविष्यात कोणताही उपयोग नाही.

सदर १८ मी.रुंद रस्त्यामध्ये महानगरपालिका तसेच प्राधिकरणाच्या हद्दीमध्ये दत्तात्रय नगर क्र. १, २, ३ मध्ये रहिवासी रहात असून त्यांची सर्व घरे १८ मी. रुंदिच्या रस्त्यामध्ये बाधित होत आहेत. रस्त्यामुळे बाधित होणा-या घरांची संख्या जवळपास १३० एवढी आहे. सदर रहिवासी गेले २०-२५ वर्षापासून या घरांमध्ये रहात आहेत. त्यामुळे सदर रस्ता विकसित होवू शकणार नाही.

उत्तर दक्षिण असणा-या १८ मी. रुंद रस्त्याचे पूर्व बाजूस आरक्षित असलेल्या १८ मी. रुंदीच्या रस्त्यापासून दक्षिण बाजूस केवळ ८० मी. अंतरावर सध्या १२ मी. रुंदीचा समांतर डांबरी रस्ता अस्तित्वात आहे. हाच रस्ता पुढे प्राधिकरणाच्या हद्दीतून जाऊन २४ मी.रुंदीच्या उत्तर दक्षिण रस्त्यास मिळतो व त्यामुळे वाहतुकीच्या दृष्टीने कोणतीही अडचण येत नाही. तथापि अस्तित्वातील रस्ता विकास आराखडयात दर्शविलेला नाही. सदर अस्तित्वातील / वापरात असलेल्या रस्ता विकास आराखडयात दर्शवून तो पुढे भविष्यात १८ मी. रुंदीचा करता येवू शकतो.

त्यामुळे सदर उत्तर दक्षिण असणा-या १८ मी.रुंद रस्त्याचे पूर्व बाजूस आरक्षित असलेल्या १८ मी. रुंदीचा विकास योजना रस्त्याची आवश्यकता नसल्याने कलम ३७ अन्वये असणा-या तरतुदीनुसार रद्द करणे अथवा डि.सी. रुल १४.४.१ जी अन्वये शिफ्ट करणेबाबत योग्य ती कार्यवाही करणेसाठी मा.आयुक्त यांना सर्व अधिकार देण्यात यावेत.

**मा.अरुण बो-हाडे -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देतो.

**मा.विनायक गायकवाड -** मा.महापौर साहेब, योगेश बहल यांची उपसूचना स्विकारली आहे.

**मा.महापौर -** योगेश बहल यांचे उपसूचनेसह विषय मंजूर करणेत येत आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक - ६१८ विषय क्रमांक - ११

दिनांक - २३/१२/२०१४ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ - **१)** मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र. नरवि/कावि/९/२९१/२०१४ दि.३०/०७/२०१४

२) मा.शहर सुधारणा समिती सभा ठ.क्र.२७ दि.१०/१२/२०१४

मौजे पिंपळे निलख येथील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेतील स.नं.६५ पै. ते ६७ पै. १८.०० मी. रुंद रस्त्याचे आखणीमध्ये बदल करुन रस्त्यांची रुंदी २४.०० मी. करणेबाबत म.प्रा. व न.र. अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करणेबाबतची कार्यवाही चालू आहे. सदर प्रस्तावास मा.महापालिका सभेने ठराव क्र.३०० दि.२७/०६/२०१३ अन्वये मान्यता देणेत आलेली आहे. सदर ठरावानुसार फेरबदल दर्शविणारा नकाशा उपसंचालक, नगररचना व विकास विभाग पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचे कार्यालयात ठेवणेत आला होता. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत आला होता. तसेच सदर फेरबदलाची जाहिर नोटीस दि.२१/११/२०१३ च्या दै.लोकमत या मराठी माध्यमाच्या वर्तमानपत्रात व दै.टाईम्स ऑफ इंडिया या इंग्रजी माध्यमाच्या वर्तमानपत्रात प्रसिध्द करणेत आली होती. महाराष्ट्र शासन राजपत्रामध्ये दि.०४/१२/२०१३ नुसार जाहिर नोटीस प्रसिध्द करणेत आली होती. सदर जाहिर नोटीशीच्या अनुषंगाने प्रस्तावित फेरबदलाबाबत नागरिकांच्या ३२ हरकती या विभागाकडे प्राप्त झाल्या आहेत. सदरच्या प्राप्त हरकतधारकांना दि.२१/०४/२०१४ रोजी सुनावणी देण्यात आली आहे. सुनावणीच्या वेळेस हरकतधारकांनी नमुद केलेले मुद्दे व हरकती यांचा विचार करुन मनपाचा अभिप्राय त्या बाबतचा अहवाल प्रस्तावासोबतच्या तक्त्यात नमुद केलेला आहे. सदर फेरबदलाचा प्रस्ताव महाराष्ट्र शासनास मंजूरीसाठी सादर करणेस मान्यता देणेत येत आहे तसेच मा.महापालिका सभा क्र. ३५ विषय क्र. १७ ठराव क्र. ५८४ दि.१०/११/२०१४ च्या मा.महापालिका सभेत प्रभाग २८ मासुळकर कॉलनी येथील आरक्षण क्र. ७७ व ७९ स.नं. १०९/११० असून सदरचे क्षेत्र अनुक्रमे ०.६४ हेक्टर चौ.मी. व ०.४४ हेक्टर चौ.मी. आहे ते बेघरासाठी घरे यासाठी आरक्षित आहे. सदर जागा महापालिकेच्या ताब्यात आहे. मुंबई प्रांतिक अधिनियम १९६६ च्या कलम ३७ अन्वये फेरबदलचा सदर प्रस्ताव तयार करुन हरकती सुचना मागवून शासनास सादर करण्यास

मा.आयुक्त यांना अधिकार प्रदान करणेकामी विषय मंजूर केलेला आहे. पुढील प्रमाणे सुधारणा / दुरुस्ती करण्यात यावी.

प्रभाग २८ मासुळकर कॉलनी येथील आरक्षण क्र. ७७ व ७९ स.नं. १०९ / ११० असून सदरचे क्षेत्र अनुक्रमे ०.६४ हेक्टर चौ.मी. व ०.४४ हेक्टर चौ.मी. आहे ते बेघरासाठी घरे यासाठी आरक्षित आहे. सदर जागा महापालिकेच्या ताब्यात आहे. मुंबई प्रांतिक अधिनियम १९६६ च्या कलम ३७ अन्वये मनपा उपयोगी ( वॉर्ड सेंटर व उद्यान ) व मनपा उपयोगासाठी अशी दुरुस्ती करण्यात येत आहे. दुरुस्तीसह फेरबदलचा प्रस्ताव तयार त्यावर हरकती व सुचना मागविण्यात येऊन तो शासनास सादर करण्यास मा.आयुक्त यांना अधिकार प्रदान करणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल- ८२ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव योगेश बहल यांचे उपसुचनेसह सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.अरुण बो-हाडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १२ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक - ६१९ विषय क्रमांक - १२

दिनांक - २३/१२/२०१४ विभाग - मा.आयुक्त

**संदर्भ - १)** मा.सुमन नेटके, मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव.

**२)** मा.शहर सुधारणा समिती सभा ठ.क्र.३६, दि.१०/१२/२०१४

मौजे मोशी गावाचे ग्रामदैवत श्री.नागेश्वर महाराज असून ग्रामस्थ भंडा-याचा उत्सव गेली अनेक वर्षे करीत आहेत व सदर उत्सवास धार्मिक परंपरा आहे. सदर उत्सवाचा कार्यक्रम गावाच्या मध्यभागी विकास आराखडयातील आ.क्र.१/१७७ बस टर्मिनल या जागेवर होत आहे. सद्यस्थितीत गावामध्ये कोठेही मोकळी जागा नसल्यामुळे गावातील सर्व धार्मिक कार्यक्रम याच जागेवर करणेत येत असून ग्रामिण परंपरा जगविण्यासाठी सदर जागेवरील बस टर्मिनलचे आरक्षण रद्द करुन खेळाचे मैदानाचे आरक्षण केल्यास सदर जागेचा वापर मुलांना खेळण्यासाठी तसेच धार्मिक कार्यक्रमांसाठी वापरता येणे शक्य आहे व तशी ग्रामस्थांची मागणी आहे. सद्यस्थितीत महानगरपालिकेतील जकात नाके रद्द झाल्यामुळे मौजे मोशी येथील आ.क्र.१/१७० जकात नाक्यासाठी १.६० हेक्टर क्षेत्र आरक्षित असून सदर आरक्षणातील ०.७५ आर महानगरपालिकेच्या ताब्यात आले असून उर्वरित क्षेत्र ताब्यात येण्याच्या मार्गावर आहे. तरी सदर मोशी गावातील आ.क्र.१/१७७ बस टर्मिनलची जागा गावाच्या मध्यभागी व श्री.नागेश्वर महाराज समाधीच्या बाजूला असल्यामुळे जकात नाक्याची ताब्यात आलेल्या आ.क्र.१/१७० मधील जागेमध्ये सदर आरक्षण स्थलांतर करावे किंवा रद्द करुन खेळाच्या

मैदानासाठीचे आरक्षण प्रस्तावित करणेत यावे. प्रस्तावित या आरक्षणास म.प्रा.न.र. अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलास मान्यता देणेत येत आहे.

**मा.मंदा आल्हाट -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८२ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १३ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ६२० विषय क्रमांक - १३

दिनांक - २३/१२/२०१४ विभाग - मा.आयुक्त

**संदर्भ -** १) मा.आर.एस.कुमार, मा.आशा सुर्यवंशी यांचा प्रस्ताव.

२) मा.शहर सुधारणा समिती सभा ठ.क्र.३८, दि.१०/१२/२०१४

पिंपरी चिंचवड महानगरपलिकेने आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांसाठी घरे बांधण्याचे योजिले आहे. तथापि अजूनही अशा नागरिकांची निकड पुर्ण होऊ शकलेली नाही. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विकास आराखडयात ब-याच जागा आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांकरिता राखून ठेवलेल्या आहेत. परंतु त्या अजून विकसीत झालेल्या नाहीत अशा आरक्षित जागा महापालिकेस जमीनमालकांकडून भूसंपादनाच्या माध्यमातून किंवा टीडीआरद्वारे ताब्यात घेऊन विकसित कराव्या लागतील. सदर जागा ताब्यात घेणे व नंतर बांधकाम करणे या बाबींसाठी महापालिकेस बराच कालावधी व कोटयावधींचा खर्च येऊ शकतो. महापालिकेच्या सध्याच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीनुसार काही आरक्षणे ठराविक बांधीव हिस्सा मनपास विनामोबदला महापालिकेस देण्याच्या अटीवर स्वत: जमीनमालक समावेशक आरक्षणाच्या धर्तीवर विकसित करु शकतात. शासनाच्या सन १९९४ च्या निर्णयानुसार विकास आराखडयातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांसाठी घरे व अशा प्रकारच्या राखीव जागा स्वत जमीनमालक समावेशक आरक्षणाच्या माध्यमातून विकसित करु शकतात. त्यामुळे विकास आराखडयातील आरक्षित जागेचा मनपास कोणतीही आर्थिक झळ न पोचता विकास होऊ शकतो व त्यासाठी त्याबदल्यात ठराविक बांधीव क्षेत्रही महापालिकेस विनामोबदला मिळू शकते. तरी शासनाच्या १९९४ च्या समावेशक आरक्षणांबाबतच्या निर्णयास अनुसरुन विकास आराखडयात आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांसाठी घरे यासाठी आरक्षित जागांसाठी आरक्षित जागेच्या एकूण बांधकामापैकी १५ टक्के बांधीव क्षेत्र मनपाला विनामोबदला महापालिकेस देण्याच्या अटीवर व तेवढया क्षेत्राचा जादा चटई क्षेत्र जमीन मालकास अनुज्ञेय करुन परवानगी

देणेस मान्यता देणेत येत आहे. अशा निर्णयाची अंमलबजावणी केल्यास विकास आराखडयातील अशा आरक्षणाच्या ब-याच जागा या धर्तीवर विकसित होऊ शकतील, सर्व सामान्य नागरिकांना शहरातील वेगवेगळया ठिकाणी घरे उपलब्ध होऊ शकतील व त्यासाठी महापालिकेवर कोणताही आर्थिक बोजा पडणार नसलेने मान्यता देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८२ प्रतिकुल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, ठराव क्रमांक १४ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - १४

दिनांक - २३/१२/२०१४ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र. भूजि/६/कावि/३६५/२०१४ दि.६/१२/२०१४

म.न.पा.चे यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय येथे ना नफा ना तोटा या तत्त्वावर मेडीकल स्टोअर सुरु करणेस परवानगी मिळणेबाबत पिं.चिं.म.न.पा.कर्मचारी महासंघाची मागणी आहे.सदर मेडीकल स्टोअरमधून म.न.पा.तील अधिकारी, कर्मचारी व सेवानिवृत्त्त कर्मचारी यांना योग्य व रास्त दरात औषधे उपलब्ध होणार आहे.सदर बाब म.न.पा.चे कर्मचारी वर्गासाठी कल्याणकारी आहे. त्यामुळे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ६६(१८), ७९(क) व ७९ (ड) चे अनुषंगाने व स्थायी ठराव क्र.७५७१ दि.५/८/१४ नुसार पिं.चिं.म.न.पा. कर्मचारी महासंघास म.न.पा.चे यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय येथे मेडीकल स्टोअरसाठी ५ (पाच) वर्षे भाडेकराराने व नगररचना विभाग ठरविल त्या भाडेदराने निविदा न मागविता थेट पध्दतीने जागा उपलब्ध करुन देणेबाबत.

म.न.पा.चे यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय येथे मेडीकल स्टोअर सुरु करणेस परवानगी मिळणेबाबत पिं.चिं.मनपा कर्मचारी महासंघाची मागणी आहे.सदरची संघटना म.न.पा.कडील एकमेव शासन मान्यताप्राप्त संघटना आहे. कर्मचारी महासंघ नियोजित मेडिकल स्टोअरमधून म.न.पा.चे अधिकारी व कर्मचारी तसेच सेवानिवृत्त मन.पा.कर्मचारी यांना ना नफा ना तोटा या तत्त्वावर औषधे उपलब्ध करुन देणार आहे. त्याचा फायदा म.न.पा.कर्मचारी व त्यांचे कुटुंबियांना होणार आहे. सदरची बाब म.न.पा.चे कर्मचारी वर्गासाठी कल्याणकारी आहे. त्यामुळे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६६ (१८) नुसार महापालिकेस स्वेच्छा

निर्णयानुसार महापालिका कर्मचा-यांच्या किंवा त्यांच्या वर्गाच्या कल्याणासाठी अन्य कोणत्याही उपाययोजना करणेबाबत तरतूद आहे.

मा.नगरसदस्या पारीत मा.स्थायी समिती ठराव क्र.७५७१ दि.५/८/२०१४ अन्वये यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय येथे मेडीकल स्टोअरसाठी पिं.चिं.कर्मचारी महासंघास ५ वर्षे कालावधीसाठी भाडेकराराने जागा देणेबाबत ठराव मंजूर आहे.पिं.चिं.म.न.पा.कर्मचारी महासंघाने कर्मचा-यांच्या विविध समस्यांचे निराकरण करणेकामी मा.आयुक्त यांचे दालनामध्ये दि.२४ डिसे.२०१२ रोजी आयोजीत केलेल्या बैठकीमध्ये कर्मचारी महासंघास प्रस्तुत मेडिकल स्टोअरसाठी यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयमध्ये जागा उपलब्ध करुन देणेचे मान्य करणेत आले आहे.

उपरोक्त बाबींचा विचार करता म.न.पा.चे यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय येथे ना नफा ना तोटा या तत्त्वावर मेडीकल स्टोअर सुरु करणेबाबतची बाब म.न.पा.चे कर्मचारी वर्गासाठी कल्याणकारी आहे. त्यामुळे महाराष्ट्र अधि.कलम ६६ (१८) चे अनुषंगाने तसेच कलम ७९ (क) व ७९ (ड) व मा.स्थायी समिती ठराव क्र.७५७१ दि.५/८/२०१४ नुसार पिं.चिं.म.न.पा. कर्मचारी महासंघास म.न.पा.चे यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय येथे मेडिकल स्टोअरसाठी ५ (पाच) वर्षे भाडेकराराने नगररचना ठरविल त्या भाडेदराने निविदा न मागविता थेट पध्दतीने जागा उपलब्ध करुन देणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.मंगलाताई कदम -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, माझे सर्व सहकारी. मेडीकल स्टअर्स चालवणेस देण्याचा हा विषय आहे. हा विषय सर्व सदस्यांना अभ्यास करण्यासाठी तहकूब करणेत यावा. विषय क्रमांक १४ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा अशी सूचना मी मांडते.

**मा.सविता साळुंके -** मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देते.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक - **६२१** विषय क्रमांक - १४

दिनांक - २३/१२/२०१४ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र. भूजि/६/कावि/३६५/२०१४ दि.६/१२/२०१४

विषय क्रमांक १४ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल - ८२ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

**मा.शांताराम भालेकर -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १५ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक - **६२२** विषय क्रमांक - १५

दिनांक - २३/१२/२०१४ विभाग - मा.नगरसचिव

**<u>विधी समिती</u>**

दि.०५/०९/२०१४ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.बाळासाहेब तरस -** मा.महापौर साहेब, ठरावास मी अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८२ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.शांताराम भालेकर -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १६ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक - **६२३** विषय क्रमांक - १६

दिनांक - २३/१२/२०१४ विभाग - मा.नगरसचिव

**<u>मा.महिला व बालकल्याण समिती</u>**

अ) दि.२४/०९/२०१४ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ब) दि.०८/१०/२०१४, दि.२७/१०/२०१४ व दि.१२/११/२०१४ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

क) दि.१५/११/२०१४ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ड) दि.२६/११/२०१४ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.बाळासाहेब तरस -** मा.महापौर साहेब, ठरावास मी अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८२ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.शांताराम भालेकर -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १७ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक - **६२४**  विषय क्रमांक - १७

दिनांक - २३/१२/२०१४  विभाग - मा.नगरसचिव

**<u>मा.शहर सुधारणा समिती</u>**

अ) दि.१७/०९/२०१४, दि.०१/१०/२०१४ दि.१७/१०/२०१४ व दि.०५/११/२०१४ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ब) दि.०१/१०/२०१४, दि.१७/१०/२०१४ व दि.०५/११/२०१४ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

क) दि.०५/११/२०१४ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.बाळासाहेब तरस -** मा.महापौर साहेब, ठरावास मी अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८२  प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.महापौर** - सर्वांचे आभार मानून आणि नवीन वर्षाच्या व ख्रिसमसच्या सर्वांना शुभेच्छा देवून आजची सभा संपली असे जाहीर करणेत येत आहे.

(धराडे शकुंतला भाऊसाहेब)
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
नगरसचिव कार्यालय
क्रमांक - नस/९/कावि/२०/२०१५
दिनांक - २१/ १ /२०१५



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांजकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.